मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळ,मुंबई

शुक्रवार दिनांक ०५/०१/२००२ रोजी झालेल्या ७३ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाची ७३ वी बैठक शनिवार दि.०५/०१/२००२ रोजी दुपारी ३.०० वाजतां, गृहनिर्माण भवनातील तिस-या मजल्यावरील गुलझारीलाल नंदा सभागृह येथे संपन्न झाली.

सदर बैठकीस खालील मान्यवर उपस्थित होते.

१.	मा.आमदार श्री.सचिन भाऊ अहिर	सभापती
२.	श्री.एस्.एस्.झेंडे	मुख्य अधिकारी
३.	मा.श्री.सचिन मा.सावंत	सदस्य
४.	मा.श्री.विश्वास मोकाशी	सदस्य
५.	मा.श्री.गजेंद्र लष्करी	सदस्य
६.	मा.श्री.रघुनाथ थवई	सदस्य
७.	मा.श्रीमती छाया कल्याणी	सदस्या
८.	मा.श्री.रमेश परब	सदस्य
९.	मा.श्री.उस्मान गणी कुरेशी(लाली भाई)	सदस्य
१०.	मा.श्री.मोहन देसाई	सदस्य
११.	मा.श्री.बाप्पा सावंत	सदस्य
१२.	मा.श्री.संजय शिर्के	सदस्य
१३.	मा.श्री.अबुबकर मूसा बाटलीवाला	सदस्य
१४.	उपकर संचालक व निर्धारक,म.न.पा.यांचे प्रतिनिधी	निमंत्रक
१५.	प्रमुख्य अभियंता, म.न.पा.यांचे प्रतिनिधी	निमंत्रक

बैठकीच्या सुरवातीस सचिव यांनी मा.सभापती, व उपस्थित सर्व सन्मा. सदस्य व अधिकारी यांचे स्वागत करुन त्यांना प्रशासनाच्यावतीने नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या. तसेच मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनीही मा. सभापती व सन्मा. सदस्यांच्या वतीने नववर्षाच्या शुभेच्छा दिल्या.मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनी सभागृहास असे सांगितले की, नव्याने नियुक्त झालेले मंडळाचे सदस्य, श्री कमरुददीन मर्चंट हे मा. खासदार श्री सुनील दत्त यांच्यासह पक्षाच्या कार्यक्रमासाठी मुंबईबाहेर गेले असल्याने ते या बैठकीस उपस्थित राहू न शकल्याबाबत त्यांनी कळविले आहे. तद्नंतर सचिव यांनी बैठकीस सुरवात केली.

बाब क्रमांक : ७३/१

विषय- शुक्रवार दि. ७.१२.२००१ रोजी झालेल्या मंडळाच्या ७२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्याबाबत.

मुं.इ.दु. व पु. मंडळाच्या ७२ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत स्थायी करण्यासाठी पृ.क्र.१ ते ७१ वर सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर कार्यवृत्तांत सन्मा. सदस्यांनी सर्वानुमते स्थायी केला.

....

बाब क्रमांक : ७३/२

विषय- तपोवन इमारतीच्या कक्षेतील अनधिकृत बांधकाम तोडण्याबाबत.

दि. ७.१२.२००१ रोजीच्या मंडळाच्या बैठकीत ठरल्याप्रमाणे तपोवन इमारतीच्या कक्षेतील अनधिकृत बांधकाम तोडल्याबाबतचा अनुपालन अहवाल पृ.क्र.७३ वर सादर करण्यात आला आहे.

हया अनुपालन अहवालाच्या अनुषंगाने मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी प्रशासनाने केलेल्या कार्यवाहीबददल अभिनंदन करुन आभार मानले. याबाबत मुख्य अधिकारी हयांनी का.अ./पु.वि.३ श्री पालीवाल यांनी केलेल्या कार्यवाहीबददल त्यांची प्रशंसा केली.

बाब क्रमांक : ७३/३

विषय- मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००१-२००२ चे सुधारित व २००२-२००३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक मंजूर करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.७५ ते ७७ वर सादर करण्यात आला आहे. हया प्रस्तावाच्या अनुषंगाने मुख्य अधिकारी यांनी अर्थसंकल्पाची प्रत मा.सभापती हयांना देऊन सदर अर्थसंकल्प सभागृहापूढे सादर करण्याबाबत विनंती केली. त्याप्रमाणे मा. सभापती हयांनी मंडळाच्या सन २००१-२००२ चा सुधारित व सन २००२-२००३ चा अर्थसंकल्प सभागृहापुढे सादर केला.

हया अर्थसंकल्पाच्या अनुषंगाने मा. सभापती हयांनी हया अर्थसंकल्पाची सविस्तर माहिती देण्याबाबत संबंधितांना सूचना दिल्या.

मुख्य लेखाधिकारी,दुवपु मंडळ श्री.बहोत हयांनी याबाबत प्रतिपादन करताना असे सांगितले की, सन २००१-२००२ च्या सुधारित अंदाजपत्रकात जमा रक्कम रु. १७६८१.८४ लक्ष असून खर्च रु. १५०७६.०७ लक्ष

दाखविण्यात आला आहे.त्यामुळे हा सन २००१-२००२ चा सुधारित अर्थसंकल्प रु. २६०५.७७ लक्ष ने शिलकीचा आहे. तसेच सन २००२-२००३ या वर्षाच्या अर्थसंकल्पानुसार रु. १५३०२.०५ लक्ष रक्कम जमा होतील असे अपेक्षित असून खर्च रु. १५२७३.३० लक्ष अपेक्षित आहे. हया २००२-२००३ वर्षाचे अंदाजपत्रक रु. २८.५० लक्ष ने शिलकीचा आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की,मुख्य लेखाधिकारी हयांनी अर्थसंकल्पातील ठळक वैशिष्टये सांगितली आहेतच हया व्यतिरिक्त अर्थसंकल्पातील जमेच्या सर्वसाधारण बाजूमध्ये दरवर्षी मंडळाला दुरुस्ती उपकरापोटी रु. ३८/- कोटी म.न.पा. तर्फे जमा केले जातात. त्यापैकी सेवा आकार म्हणून ५ टक्के रक्कम वळती करुन उर्वरित उपकराची रक्कम शासनातर्फे आपणांस उपलब्ध करुन दिली जाते. याशिवाय दरवर्षी जेवढी उपकराची रक्कम जमा होते तेवढयाच रक्कमेचे अंशदान शासनातर्फे मंडळास देण्यात येते. तसेच पुनर्रचनेच्या कामासाठी प्राधिकरणाकडून मंडळास रु. १० कोटी दरवर्षी दिले जातात व तेवढीच रक्कम म.न.पा. कडून अंशदानापोटी मंडळास दिली जाते. हयाप्रमाणे दरवर्षी सर्वसाधारणपणे मंडळाला सुमारे रु. १००.०० कोटी पर्यंत निधी उपलब्ध होत असतो. हया व्यतिरिक्त काही छोटया रक्कमाही अनामत रक्कमेच्या रुपाने उपलब्ध होत असतात परंतु कालांतराने हया अनामत रक्कमा मंडळाला परत कराव्या लागतात. हे सांगाण्याचे तात्पर्य असे आहे की, आपण अर्थसंकल्प म्हणजे रु. ८० ते ९० कोटी असा उल्लेख करतो परंतु सद्यः वस्तुस्थिती अशी आहे की, शासनाने हयावर्षी दुरुस्ती मंडळाला आतापर्यंत फक्त ५/- कोटी रुपये निधी उपलब्ध करुन दिला आहे. हयाबाबत त्यांनी व मा. सभापती यांनी ब-याचवेळा शासनाकडे निधी उपलब्ध करुन देण्याबाबत तसेच म.न.पा. ला उपकराची रक्कम ही उपकरप्राप्त इमारतीतील रहिवाशी असल्याने ती उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे. सध्या बरीचशी देयके अदा करावयाची असल्याने ७-८ कोटी रुपये उपलब्ध करुन देण्याबाबतही प्राधिकरणाला वारंवार विनंती केली आहे व प्राधिकरणाने निधी उपलब्ध करुन देण्यास संमती दर्शविली आहे.

मुख्य अधिकारी हयांनी पुढे अशी विनंती केली की, हया वर्षी मंडळाला अर्थसंकल्पातील तरतुदींनुसार निधी अद्याप उपलब्ध झालेला नसल्याने मा. सभापती हयांनी मंडळाच्या ५-६सदस्यांच्या शिष्टमंडळासह मा. अर्थमंत्री हयांची भेट घेऊन मंडळास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही करावी.

याबाबत मा. सभापती हयांनी असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी हयांनी सांगितल्यानुसार आपणा सर्वांनाच निधी उपलब्ध करुन देण्याबाबत आग्रही भूमिका घ्यावी लागणार आहे. मागील पूर्वानुभव लक्षात घेता सन १९९७-९८ पासून शासनाकडून मंडळास रु.१५४/- कोटी येणे बाकी आहे. मंडळाची सध्याची आर्थिक स्थिती लक्षात घेता आपण शिष्टमंडळासह मा. अर्थमंत्र्यांशी चर्चा करुन त्यांना मंडळास देय असलेली रक्कम त्वरित उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करु. मा. अर्थमंत्री हयांचेशी अगोदरच त्यांनी याबाबत चर्चा करुन निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली आहे व अशी आशा आहे की, येत्या १०-१५ दिवसांत मंडळाला निधी उपलब्ध होईल. तरीसुध्दा या विषयाबाबत मा. अर्थमंत्री हयांच्याबरोबर चर्चा करण्यासाठी एक खास बैठक १०-१५ दिवसांत घेण्याबाबत आपण शिष्टमडळासह मा. अर्थमंत्र्यांची भेट घेऊन त्यांना विनंती करु या, जेणेकरुन यामध्ये काहीतरी ठोस निर्णय घेतला जाईल. या व्यतिरिक्त मुंबई शहरातील सर्व आमदारांमार्फत

उपकराची रक्कम ही इमारतीतील रहिवाश्यांची असल्याने हा उपकराचा निधी वेळच्यावेळी मंडळास उपलब्ध करुन देण्याबाबत येत्या मार्च महिन्यातील विधानसभेच्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात याबर चर्चा घडवून आणण्यासाठीही ते मा. अध्यक्ष/प्राधिकरण श्री मधु चव्हाण हयांच्यामार्फत प्रयत्न करीत आहेत. जेणेकरुन निधीच्या उपलब्धतेचा प्रश्न कायमस्वरुपी निकाली निघेल.

३ जानेवारी २००१ रोजी मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य हयांनी पिंपळवाडी व इतर दोन इमारतींबाबत बैठक घेतली होती. हया बैठकीमध्येही त्यांना मंडळाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती करण्यात आलेली आहे. गेल्या दिवाळीपासून पुनर्रचनेच्या कामासाठी आपणाला अजिबात निधी मिळालेला नाही. पुनर्रचनेची कामे करणा-या ठेकेदारांनी भेट घेऊन निधी त्वरित उपलब्ध करुन देण्याची विनंती केली आहे. अन्यथा पुनर्रचनेची सर्व कामे थांबविण्यात येतील अशी भूमिका हया ठेकेदारांनी घेतली होती.परंतु आपण त्यांची समजूत काढून त्यांना पुनर्रचनेची कामे चालू ठेवण्याबाबत विनंती केली होती. हयाबाबत प्राधिकरणाला निधी उपलब्ध करुन देण्याबाबत विनंती केली असता प्राधिकरणाने असे सांगितले की, हयापूर्वीच प्राधिकरणाने मंडळाला ४० कोटी रुपये देऊ केले आहेत हया परिस्थितीत आणखी निधी देणे शक्य नाही. याबाबत आपण प्राधिकरणाला शासनाच्या सध्याच्या आदेशानुसार त्वरित निधी उपलब्ध करुन देण्याबाबत मा. उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना विनंती केली आहे. व त्यांनी दिलेल्या शब्दानुसार अशी आशा आहे की, थोडयाच दिवसांत प्राधिकरणाकडून मंडळाला रु. १० कोटी निधी उपलब्ध होईल. परंतु हा प्रकार कायमचा बंद करण्याच्या दृष्टीने आपण शिष्टमंडळासह मा. अर्थमंत्री हयांची लवकरात लवकर भेट घेऊ या तसेच आता गृहनिर्माण विभागाचे सचिव नवीन आलेले असून त्यांनाही हया प्रकरणात लक्ष घालण्याची विनंती करु या.

वरील सविस्तर चर्चेअंती मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००१-२००२ चे सुधारित व सन २००२-२००३ चे अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक प्राधिकरणाकडे सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले.

....

ठराव क्रमांक : ७३/५४५

मुंबई इमारत दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाचे सन २००१-२००२ च्या सुधारित व सन २००२-२००३ च्या अर्थसंकल्पीय अंदाजपत्रकास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली. सदर अर्थसंकल्प प्राधिकरणास सादर करण्याविषयी सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/४

विषय- अ) इ.क्र.१-२-३, मानाजी राजूजी चाळ, स्टँडर्ड मिल लेन,ग.दक्षिण विभाग पुनर्बांधणी योजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.७९ ते ८९ वर सादर करण्यात आला आहे.

याबाबत सुरवातीस उपमुख्य अभियंता (पुनर्र) श्री.वणीकर यांनी सभागृहाच्या असे निदर्शनास आणून दिले की, हया कामाबाबत व हया कामाच्या निम्नतम ठेकेदाराविरुध्द एक तक्रार प्राप्त झाली असून त्या तक्रारीची प्रत सर्व सन्मा. सदस्यांना दिलेली आहे. ही तक्रार मा. एन. विठ्ठल, निवृत्त आय.ए.एस.अधिकारी हयांना दिलेली आहे. हया तक्रारीचा सर्वसाधारण आशय असा आहे की, ठेकेदार मे. जय कन्स्ट्रक्शन यांचे दुसरे काम हयाच कामाच्या बाजूला सुरु असून ते १७ टक्क्यांनी कमी दराने करीत आहेत. परंतु हया कामाची निविदा त्यांनी मात्र १२.५१ टक्के जादा दराने भरली आहे. त्यामुळे हयामध्ये भ्रष्टाचार झाला आहे असे तक्रारदाराचे म्हणणे आहे. तक्रारदाराचा दुसरा मुद्दा असा आहे की, दुस-या एका ठेकेदाराने निविदा भरताना निविदेत खाडाखोड केलेली आहे. हा प्रशासकीय मुद्दा असल्याने हयाबाबत संबंधित ठेकेदारास त्यांनी केलेल्या खाडाखोडीबाबत पत्र पाठविले असल्याचे उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर यांनी स्पष्ट केले. तसेच तक्रारदाराने पिंपळवाडी कामाच्या बदल्यात दुसरे काम देण्याबाबत विनंती केली आहे. परंतु पिंपळवाडी कामाचा प्रश्न ही प्रशासकीय बाब असल्याने तक्रारदाराचा हा मुद्दा विचारात घेण्याचा प्रश्न उद्भवत नाही. हया निविदेबाबत निर्णय घेण्यापूर्वी वरील तक्रार आपणास माहिती करुन देण्याच्या उद्देशाने आपल्या निदर्शनास आणून दिलेली आहे.

उपमुख्य अभियंता(पुनर्रचना) हयांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, वरील तक्रार प्राप्त झाल्याबरोबर आपण संबंधित ठेकेदारांना पत्र पाठवून अशी विचारणा केली होती की, त्यांचे दुसरे शेजारील काम ते १७ टक्के कमी दराने करीत असताना सदर कामाची निविदा त्यानी १२.५१ टक्के जादा दराने भरण्याबाबत खुलासा करावा. तसेच हयाबाबतीत वास्तुशास्त्रज्ञांचाही अहवाल मागविला होता. वास्तुशास्त्रज्ञांनी जो अहवाल सादर केलेला आहे त्यानुसार शेजारील काम (इ.क्र.४-५-६) हे साधारणतः डिसेंबर-२००० मध्ये सुरु झाले आहे. हया इमारतीच्या पायाचे काम अगोदरच झाले असल्याने हया ठेकेदारास फक्त पायावरील बांधकाम करण्यास देण्यात आले आहे. त्यामुळे हया कामामध्ये पायाच्या बांधकामामध्ये जो बराच वेळ जातो तो वेळ हया ठेकेदाराचा वाचलेला होता तसेच हयामध्ये एकाच प्रकारच्या कामासाठी वारंवार सेटरिंग करावे लागणार नव्हते. हे काम आतील बाजूला नसल्यामुळे बांधकाम साहित्य ठेवण्यास ठेकेदाराला हया ठिकाणी जागा उपलब्ध होती. आता जे काम करावयाचे आहे त्यामध्ये त्याला पायाचेही बाधकाम करावयाचे असून त्यासाठी त्याला वेगळया यंत्र सामुग्रीचीही व्यवस्था करावी लागणार आहे. ही व्यवस्था त्याला दुस-या कामात (इ.क्र.४-५-६) करावी लागलेली नाही. सदर ठेकेदाराने बांधकाम साहित्यातील दराचे विवरण सादर केलेले आहे. हयामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, ज्या दरसूचीवर ही निविदा मागविली आहे ती दरसूची सार्वजनिक बांधकाम विभागाने जुलै २००० मध्ये मंजूरी दिली असून प्राधिकरणाने ही दरसूची दि. ६.१०.२००० रोजी मंजूर केलेली आहे. त्यामुळे दरसूची मंजूर केल्याच्या दिवसापासून निविदा मंजूर करण्यापर्यंत बराच कालावधी गेला आहे. हया कालावधी मध्ये बांधकाम साहित्यात जी वाढ झाली आहे त्याचे सविस्तर विवरण सदर ठेकेदाराने सादर केले असून त्यानुसार हया दरसूचीतील दर हे ११ टक्क्यांनी वाढल्याचे दाखविले आहे. हया व्यतिरिक्त ठेकेदाराला टर्न ओव्हर टॅक्सपोटी ४ टक्के रक्कम भरावी लागते, जी आपल्या निविदेत समाविष्ट केलेली नाही. सिव्हरेज व

एक्स्ट्रा वॉटर चार्जेस हयासाठीही २ टक्के रक्कम ठेकेदाराला भरावी लागते. हयाव्यतिरिक्त आता जे काम करावयाचे आहे त्या ठिकाणी बांधकाम साहित्य ठेवण्यास जागा नसल्याने बांधकाम साहित्य फूटपाथवर ठेवावे लागणार आहे. त्यामुळे हयासाठी त्याला म.न.पा.कडे रक्कम भरावी लागणार आहे.परंतु बाजूच्या इमारतीच्या कामाच्या ठिकाणी बांधकाम साहित्य ठेवण्यास जागा होती.

हयाबाबत ठेकेदारांनीही असा खुलासा सादर केला आहे की, इ.क्र.४-५-६ चे काम घेण्याअगोदर त्याच्याकडे कामे नव्हती. त्यामुळे त्यावेळी त्याच्या मजूरांना काम न करता नियमित मजूरी द्यावी लागत होती. हयामुळे त्याचा ब-याच प्रमाणात आर्थिक तोटा होत होता. हा आर्थिक तोटा भरुन काढावयाचा होता तसेच हे फक्त पायावरील बांधकाम असल्याने एकदा सेन्टरिंग केल्यानंतर त्याला वारंवार सेन्टरिंग करण्याची गरज भासणार नव्हती व हे काम लवकर पूर्ण होणारे होते. हे काम घेताना त्याने असे गृहीत धरले होते की, संपूर्ण बांधकाम साहित्य एकदम विकत घेऊन त्याचा साठा करण्यास वाव आहे. परंतु प्रत्यक्षात काम करताना तो असे करु न शकल्याने त्याला हया कामासाठी चढया भावाने वेळोवेळी बांधकाम साहित्य घ्यावे लागले. हयामुळे हया कामामध्ये त्याला आर्थिक तोटा झाला असल्याचे त्याने खुलाशात नमूद केले आहे. आता करावयाच्या कामाबाबत त्याने जी बोली दिली आहे (१२.५१ टक्के जादा) त्याबाबत त्याने खुलाशादाखल वास्तुशास्त्रज्ञांनी त्यांच्या अहवालात नमूद केलेली वरील कारणे दिली आहेत. त्याशिवाय त्याने असेही नमूद केले आहे की, २७ महिन्यांच्या कालावधीमध्ये बांधकाम साहित्यात ब-याच प्रमाणात वाढ झालेली आहे. दरवर्षी बांधकाम साहित्य, मजूरी, दळणवळण व्यवस्था हयामध्ये ७ ते ८ टक्के वाढ होते. हयाशिवाय हे काम पूर्ण होईपर्यंत दोन ते तीन अंदाजपत्रकीय वर्ष जाणार आहेत. परंतु इ.क्र.४-५-६ चे काम डिसेंबर-२००० मध्ये सुरु होऊन ते मार्च-२००२ मध्ये पूर्ण होत असल्याने हया कालावधीत त्यामुळे हया कामात फक्त एका वर्षाच्या अंदाजपत्रकाचा फरक आहे.आता करावयाच्या कामाचा काम पूर्ण करण्याचा कालावधी २४ महिन्यांचा असल्याने त्यामध्ये तीन वेळा वार्षिक अंदाजपत्रक होणार आहे, ज्यामध्ये बांधकाम साहित्यात ब-याच प्रमाणात वाढ अपेक्षित आहे. इ.क्र.४-५-६ ची जागा ही मोकळी जागा होती परंतु आता करावयाच्या कामाच्या ठिकाणी अद्याप जुन्या इमारती अस्तित्वात आहेत. हया जुन्या इमारती प्रथम पाडाव्या लागणार आहेत. त्यामुळे हे काम प्रत्यक्ष सुरु होण्यास २ ते ३ महिन्यांचा कालावधी लागणार आहे.

वरील परिस्थितीत हया निम्नतम निविदेबाबत योग्य तो निर्णय घेण्याची विनंती उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी सभागृहास केली.

हयाबाबत मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी अशी विचारणा केली की, सादर केलेल्या प्रस्तावानुसार निम्नतम निविदेत नमूद केलेला दर हा जास्त असल्याने तो दर कमी करण्याबाबतचा प्रस्ताव आहे व त्या अनुषंगाने संबंधित ठेकेदारांशी काही बोलणी झाली आहेत का ?

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी खुलाशादाखल असे प्रतिपादन केले की, सध्याच्या निविदा दरांच्या मंजूरीनुसार ठेकेदारांनी भरलेल्या दरांची माहिती प्रस्तावात सादर केली आहे. निविदा मंजूर करणे वा अस्विकृत करणे हयाबाबतचे अधिकार हे मंडळाला असल्याने हया निविदेबाबत त्यानुसार योग्य तो निर्णय घेण्याची विनंती उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी सभागृहास केली.

हयाबाबत मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी अशी विचारणा केली की, आपण नेहमी निम्नतम दराचीच निविदा मंजूर करतो का ? त्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, नियमांनुसार आपणास निम्नतम दराचीच निविदा मंजूर करावी लागते. निविदाधारकाने निविदेत नमूद केलेला दर कमी करण्याचे अधिकार मंडळाला असल्याने सदर प्रस्ताव मंडळापुढे सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मा. सदस्य श्री सचिन सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, हया कामाबाबत झालेल्या तक्रारीच्या अनुषंगाने उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी जे मुद्दे सांगितले त्यानुसार दर सूचीचे दर हे २७ महिन्यापूर्वीचे असल्याने सध्याच्या दरात वाढ होणे अपेक्षित आहे. आपण मागे ज्या निविदा मंजूर केल्या त्यांचाही दर ९ टक्के व ९.५० टक्के आहे. हे दोन्ही मुद्दे ग्राहय आहेत.

मा. सदस्य, श्री गजेंद्र लष्करी हयांनी याबाबत असे प्रतिपादन केले की, ही तक्रार बहुतेक सर्व सदस्यांना प्राप्त झाली असून तक्रारदाराने सदस्यांना दूरध्वनीही केले होते. तक्रारदाराने जेव्हा त्यांना दूरध्वनी केला होता तेव्हा त्यांनी त्याला चर्चेसाठी आमंत्रित केले होते. परंतु तक्रारदाराने स्वतःचे नाव, पत्ता दिला नाही. त्यामुळे तक्रारदाराशी संपर्क होऊ शकलेला नाही.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हया निविदेनाबाबतचा निर्णय आपणच घेणार आहोत परंतु तक्रारदाराने जी तक्रार केली आहे ती आपणा सर्वांकडे केली असल्याने ही तक्रार त्रयस्थ व्यक्ती म्हणून मुख्य अभियंता/प्राधिकरण यांच्याकडे चौकशीसाठी पाठवून त्यांच्याकडून हया तक्रारीची शहानिशा होणे जरुरीचे आहे.मात्र ही निविदा मंजूर करण्याचे अधिकार मंडळास असल्याने त्याबाबतचा निर्णय आपणच घेऊ या.

याबाबत मा. सदस्य श्री. सचिन सावंत यांनी असे प्रतिपादन केले की, मागे ज्या दोन निविदांच्या बाबतीत आपण निर्णय घेतला होता त्याचप्रमाणे हया निविदेबाबत आपण निर्णय घेऊ या.

वरील सविस्तर चर्चेअंती विषयांकित कामाची निविदा १२.५१ टक्के जादा वरुन कमी करुन ९.५० टक्के जादा दराने मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले तसेच तक्रारी बाबत मुख्य अभियंता-२/प्रा.यांना टिप्पणी पाठवून त्यांचे अभिप्राय घेण्याच्या सूचना देण्यात आल्या.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर यांनी मा.अध्यक्षांच्या परवानगीने आयत्या विषयाच्या सदरात खालील दोन पुनर्बांधणीच्या योजनांना स्विकृती देण्याबद्दलचे प्रस्ताव सर्व सन्मा.सदस्यांना सादर केले.

१. इ.क्र.२६१-२६७, २७१-२६९-अे, ए.एस्.जी. मार्ग, रंगारी बोरी चाळ, ई. विभाग पुनर्बांधणी योजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव.

२. इ.क्र.१५-२१, खारवा गल्ली, फॉकलंड रोड, ६वी गल्ली, डी. विभाग मुंबई या येजनेच्या कामाच्या निम्नतम निविदेस मंजूरी देण्याबाबतचा प्रस्ताव.

उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर यांनी सदर प्रस्तावाची माहिती देताना सांगितले की, रंगारी बोरी चाळ, ई विभाग या पुनर्बांधणी याजनेच्या कामाच्या निविदा एकूण १० टक्के दराने भरलेल्या होत्या. त्यापैकी मे.अमृतलाल सुखवानी यांची सर्वात कमी म्हणजे १२.६० टक्के अधिकची निम्नतम निविदा आहे, तरी सदर

निविदा स्विकृत करण्याचा अधिकार मंडळास असल्याने याबाबत सभागृहाने योग्य तो निर्णय द्यावा, अशी विनंती त्यांनी सभागृहास केली. तसेच उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर यांनी इमारत क्र.१५-२१ या योजनेच्या निविदेबाबत माहिती देताना सांगितले की, सदर कामाच्या एकूण ६ निविदा प्राप्त झाल्या होत्या, त्यापैकी प्रथम निम्नतम ठेकेदार मे.मोतीराम बुधरमल यांनी १६.५५ टक्के अधिक दराची निविदा भरलेली ओ. सदर निविदा स्विकृत करण्याचे अधिकार मंडळास असल्याने ही बाब मंडळासमोर सादर करण्यात आलेली आहे.

वरील दान्ही प्रस्तावावर सविस्तर आणि साकल्याने चर्चा होवून चर्चेअंती पुढील पमाणे निर्णय घेण्याचे ठरले.

१) इ.क्र.२६१-२६७, २७१-२६९-अे, ए.एस्.जी. मार्ग, रंगारी बोरी चाळ, ई. विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे. अमृतलाल सुखवानी हयांची निम्नतम निविदा १२.६० टक्के अधिक वरुन कमी करुन ९.५० टक्के जादा दराने स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

२) इ.क्र.१५-२१, खारवा गल्ली, फॉकलंड रोड, ६वी गल्ली, डी. विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे. मोतीराम बुधरमल हयांची निम्नतम निविदा १६.५५ टक्के अधिक वरुन कमी करुन १० टक्के जादा दराने स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५४६

१) इ.क्र.१-२-३, मानाजी राजूजी चाळ, स्टँडर्ड मिल लेन, ग.दक्षिण विभाग हया पुनर्बांधणी कामाची मे जय कन्स्ट्रक्शन हयांची निम्नतम निविदा १२.५१ टक्के जादा वरुन कमी करुन ९.५० टक्के जादा दराने स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली, तसे सदर बाबत प्राप्त तक्रारीवर मुख्य अभियता-२/प्रा. यांचे अभिप्राय घेण्यात यावेत.

३) इ.क्र.२६१-२६७, २७१-२६९-अे, ए.एस्.जी. मार्ग, रंगारी बोरी चाळ, ई. विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे अमृतलाल सुखवानी हयांची निम्नतम निविदा १२.६० टक्के अधिक वरुन कमी करुन ९.५० टक्के जादा दराने स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

४) इ.क्र.१५-२१, खारवा गल्ली, फॉकलंड रोड, ६वी गल्ली, डी. विभाग हया इमारतीच्या पुनर्बांधणी कामाची मे मोतीराम बुधरमल हयांची निम्नतम निविदा १६.५५ टक्के अधिक वरुन कमी करुन १० टक्के जादा दराने स्विकृत करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली .

....

बाब क्रमांक : ७३/४ (ब)

विषय- १८-२२-२६-३०, ए.जी.पवार मार्ग, अंधार चाळ, घोडपदेव, ई.विभाग मुंबई येथील नागरी नुतनीकरण योजना, सुरक्षा व्यवस्थेवरील देयकाबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.९१ ते ९३ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) हयांनी असे प्रतिपादन केले की, ही योजना सुरवातीला पंतप्रधान अनुदान प्रकल्पांर्गत हाती घेण्यात आली होती. सन १९९८ मध्ये पंतप्रधान अनुदान प्रकल्प बंद करण्यात आल्यानंतर त्या कार्यालयांतर्गत हाती घेतलेल्या सर्व पुनर्बांधणी योजना त्यावेळी ज्या स्थितीत होत्या त्या स्थितीतच दुरुस्ती मंडळाकडे हस्तांतरित करण्यात आल्या आहेत. विषयांकित इमारतीचे काम ३१.३.९५ पर्यंत पूर्ण झालेले आहे व हया इमारतीला निवासी वापर प्रमाणपत्र (ऑक्युपेशन सर्टिफिकेट) डिसेंबर-१९९४ मध्ये दिलेले आहे परंतु रहिवाशांची सहकारी गृहनिर्माण संस्था स्थापन न झाल्याने व रहिवाश्यांच्या आपापसातील मतभेदांमुळे हया इमारतीतील गाळयांचे वाटप मे-१९९६ पर्यंत होऊ शकले नव्हते. ही इमारत डिसें.१९९४ ते मे-१९९६ पर्यंत रिकामी राहिल्याने इमारतीतील विजेची उपकरणे चोरी होऊ नयेत व इमारतीत घुसखोरी होऊ नये म्हणून त्यावेळी पंतप्रधान अनुदान प्रकल्प कार्यालयाने हया इमारतीच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने हया इमारतीमध्ये पहारेकरी ठेवले होते. प्राधिकरणाच्या दि. १४.५.९२ रोजीच्या बैठकीतील निर्णयाप्रमाणे १२ महिन्यांपर्यंतच्या कालावधीसाठी सुरक्षा व्यवस्थेच्या खर्चास मंजूरी देण्याचे अधिकार संचालक,रा.गां.नि. प्रकल्प हयांना होते.या प्रकरणात ३० महिन्यांसाठी सुरक्षा व्यवस्था ठेवावी लागल्याने व ही योजना आता दुरुस्ती मंडळाकडे हस्तांतरित झाली असल्याने ठेकेदाराने हया सुरक्षा व्यवस्थेपोटी मंडळाकडे देयक सादर केले आहे. मुख्य अभियंता-२/प्राधिकरण हयांनी त्यांच्या दि.६.६.९१ रोजीच्या पत्रातील आदेशानुसार ८ तासांसाठी एका पहारेक-यास रु. ७५०/- प्रतिमाह द्यावे लागतात. हया दरानुसार हया इमारतीच्या सुरक्षे व्यवस्थेसाठी ३ पहारेक-यांसाठी रु. २,०२,५००/- इतका खर्च येत आहे. परंतु ठेकेदाराने रु. २५००/- प्रति पहारेकरी प्रतिमाह दराने हया सुरक्षा व्यवस्थेच्या खर्चाची मागणी केली आहे. परंतु मुख्य अभियंता/प्रा. यांनी शिफारस केल्यानुसार रु. ७५०/- प्रति पहारेकरी प्रतिमाह हया प्राधिकरणाने मंजूर केलेल्या दरानुसार सदर प्रस्ताव सादर करण्यात आला असून त्यास मंडळाची संमती आवश्यक आहे. मंडळाने संमती दिल्यानंतर हा प्रस्ताव प्राधिकरणास मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हा जो प्रस्ताव सादर करण्यात आलेला आहे तो प्राधिकरणाने मंजूर केलेला दर रु. ७५०/- प्रति पहारेकरी प्रतिमाह हया दराने सादर केलेला आहे. ठेकेदाराने कोणत्याही दराची मागणी केली असेल तर आपण त्यांना रु. ७५०/- प्रति पहारेकरी प्रतिमाह हया दरानेच देयक प्राधिकरणाने मंजूरी दिल्यानंतर अदा करणार आहोत.

सविस्तर चर्चेअंती हा प्रस्ताव प्राधिकरणाकडे सादर करण्यास सर्व सन्मा. सदस्यांनी अनुमती दिली.

....

ठराव क्रमाक: ७३/५४७

इमारत क्र. १८-२२-२६-३०, ए.जी.पवार मार्ग, अंधार चाळ, घोडपदेव, ई.विभाग या इमारतीच्या सुरक्षा व्यवस्थेवरील देयकाबाबतचा प्रस्ताव पुढील मान्यतेसाठी प्राधिकरणास पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/४(क)

विषय- इमारत क्र. १३-१३ अे, नारीयलवाडी, माझगांव, ई. विभाग, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेस सुधारित प्रशासकीय मान्यता मिळणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. ९५ ते १०१ वर सादर करण्यात आला आहे.

याबाबत उपमुख्य अभियंता(पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, ही योजना माझगांवमध्ये असून या योजनेचा भूखंड मोकळा आहे. हया योजनेत आपणं ४५ (निवासी) गाळे बांधणार असून २४ (निवासी) गाळे आपणांस अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. ही जागा भाडेपट्टयावर आहे. मंडळाने हया जागेचे संपादन केल्यानंतर मंडळ भाडेपट्टाधारक होणार आहे. आपण मागे एका योजनेत केल्यानुसार हया योजनेचा भाडेपट्टा रु.१/- नाममात्र दराने जिल्हाधिकारी, मुंबई हयांच्याकडून करुन घ्यावा लागणार आहे. हया योजनेचे नकाशे म.न.पा.ने मंजूर केलेले आहेत व त्यानुसार हा सुधारित प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे. सुधारित प्रशासकीय मंजूरी प्राप्त झाल्यानंतर भूसंपादनाचा प्रस्ताव शासनाकडे मंजूरीसाठी सादर करण्यात येईल.

यावर मा. सदस्य श्री बाप्पा सावंत हयांनी असे प्रतिपादन केले की, हया इमारतीतील रहिवाश्यांमध्ये आपापसात भांडणे आहेत. भाडेकरुंच्या म्हणण्यानुसार प्रस्तावासोबत जोडलेल्या भाडेकरुंच्या यादीमध्ये काही भाडेकरुंची नांवे समाविष्ट केलेली नाहीत तसेच काही बोगस भाडेकरुंची नावे आहेत. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर करण्यापूर्वी आपण हया भाडेकरुंच्या यादीची प्रथम तपासणी करु व यादी निश्चित झाल्यानंतर हया प्रस्तावावर निर्णय घेऊ.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री बाप्पा सावंत यांनी उपस्थित केलेला मुद्दा ग्राहय आहे परंतु आता आपण फक्त हयाला प्रशासकीय मंजूरी देणार आहोत. जेणेकरुन भूसंपादनाची प्रक्रिया चालू करता येईल. त्यासाठी हा प्रस्ताव थांबविण्याची गरज नाही. रहिवाश्यांच्या यादीची सत्यासत्यता आपण दरम्यानच्या कालावधीतही पडताळून पाहू शकतो. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर करण्यास काहीच हरकत नसावी.

यावर मा. सदस्य श्री मोहन देसाई यांनी असा मुद्दा उपस्थित केला की, ही योजना १९७९ मध्ये कार्यान्वित केलेली आहे. सन १९७९ पासून आतापर्यंत जो विलंब झाला आहे त्याची कारणे काय आहेत ?

याबाबत का.अ./पु.वि.२ यांनी असा खुलासा केला की, हा भूखंड भाडेपट्टयाचा आहे. भाडेपट्टयांच्या जागांना भाडेपट्टा कोणत्या दराने आकारावा याबाबत निर्णय अद्यापपर्यंत झालेला नाही. नारीयलवाडी हया विभागातील जवळजवळ सर्व भूखंड भाडेपट्टयाने दिलेले आहेत. याबाबत आता सुकथनकर समितीने निर्णय दिलेला आहे व त्यानुसार आपण ही योजना आता प्रस्तावित केली आहे.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, भाडेपट्टयाचा दर आतापर्यंत निश्चित न झाल्याने या प्रकरणांमध्ये पुनर्बांधणीच्या कामास विलंब झालेला आहे ही वस्तुस्थिती आहे.

वरील सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या कामास सुधारित प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५४८

इमारत क्र. १३-१३ अे, नारीयलवाडी, माझगांव, ई. विभाग, मुंबई या इमारतीच्या पुनर्बांधणी योजनेच्या रु. १,१४,०१,०४३/- इतक्या रक्कमेस सुधारित प्रशासकीय मान्यता सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/५ (अ)

विषय- दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील वसाहतीमध्ये रिक्त गाळयांचे संरक्षण करण्यासाठी सुरक्षा रक्षकांची नेमणूक करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१०३ ते १०६ वर सादर करण्यात आला आहे.

याबाबत सहमुख्य अधिकारी श्री.चन्ने यांनी असे प्रतिपादन केले की, आपली जी काही वेगवेगळया ठिकाणी संक्रमण शिबीरे आहेत त्या संक्रमण शिबीरांमध्ये ब-याचवेळा घुसखोरी होत असते. हया घुसखोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने संक्रमण शिबीरांमध्ये सुरक्षा रक्षकांची सेवा घेण्याबाबतचा प्रस्ताव आहे. १९९८ पूर्वी आपण ठाणे जिल्हा सुरक्षा रक्षक मंडळ व पाल सिक्युरिटी बोर्ड यांचे सुरक्षारक्षक नेमले होते. परंतु हया सुरक्षारक्षकांचे कामकाज समाधानकारक नसल्याने त्यांची सेवा नोव्हेंबर-१९९८ पासून काढून टाकण्यात आली आहे. तेव्हापासून आतापर्यंत आपल्याकडे सुरक्षा व्यवस्था नसल्याने संक्रमण शिबीरामध्ये घुसखोरी होत आहे. हया घुसखोरीला आळा घालण्याच्या दृष्टीने संचालक, हंटर सिक्युरिटी फोर्स यांनी सविस्तर प्रस्ताव सादर केलेला आहे. हया प्रस्तावानुसार एका सुरक्षा रक्षकासाठी एकूण ४६६२/- इतका दर दिला असून एका परिवेक्षक अधिका-यास रु. ५१४२/- इतर दर दिला आहे. हया दरांनुसार मंडळास एका युनीटच्या सुरक्षा व्यवस्थेसाठी रु. १३/- लक्ष इतका वार्षिक खर्च येणार आहे. सुरक्षा रक्षकांच्या जोडीला परिवेक्षक अधिकारी नेमणे अत्यंत गरजेचे असल्याचे हया हंटर सिक्युरिटी फोर्सचे म्हणणे आहे.

यावर मा. सदस्य श्री बाप्पा सावत यांनी असे प्रतिपादन केले की, यासाठी आपण वर्तमानपत्रात जाहीरात वगैरे दिली होती का ? हया दरांपेक्षा कमी दराने काम करणा-या सुरक्षा व्यवस्था उपलब्ध आहेत. मागे जेव्हा त्यांनी संक्रमण शिबीरास भेट दिली होती तेव्हा असे आढळून आले होते की, संक्रमण शिबीरामध्ये गाळयांची कुलुपे तोडून वा अन्य मार्गाने घुसखोरी होत आहे. त्यावेळी तेथे उपस्थित असलेले मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री चौबे यांना घुसखोरी थांबविण्याच्या दृष्टीने मंडळाने काही सुरक्षा व्यवस्था नेमली आहे काय ? अशी विचारणा केली होती. त्यावेळी त्यांना असे सांगितले होते की, सुरक्षा व्यवस्था नेमण्याबाबत

प्रस्ताव विचाराधीन आहे. हा प्रस्ताव मंजूर करण्यास त्यांची कोणतीच हरकत नाही. परंतु सुरक्षा व्यवस्थेसाठी जे दर दिले आहेत ते जास्त वाटतात. ज्याप्रमाणे खाजगी कंपन्यांचे दर असतात त्याप्रमाणे हे दर आहेत. त्यामुळे त्यांनी असे प्रस्तावित केले की, हयासाठी आपण वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागवाव्यात जेणेकरुन आपणांस कमी दराने सुरक्षा व्यवस्था उपलब्ध होईल.

याबाबत मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी हयांनी अशी विचारणा केली की, झोन-१ मधील रिक्त गाळयांच्या भाडयापोटी मंडळाचे जे रु.२१/- लाख वार्षिक नुकसान होते त्याचा सविस्तर खुलासा व्हावा. तसेच संक्रमण शिबीराचे जे तीन विभाग पाडले आहेत त्या प्रत्येक विभागामध्ये हे अधिकारी कशाप्रकारे काम करणार आहेत ?

यावर सहमुख्य अधिकारी श्री.चन्ने यांनी असे प्रतिपादन केले की, रिक्त गाळयांमध्ये जी घुसखोरी झाली आहे त्यामुळे मंडळाला हे गाळे इतर रहिवाशांना वाटप करता येत नाहीत तसेच त्यामुळे हया गाळयांचे भाडेही आपणांस मिळत नाही. त्यामुळे मंडळाचे रु.२१/- लाख वार्षिक आर्थिक नुकसान होते. हे सुरक्षारक्षक आपण नेमल्यानंतर त्यांना आपण विभागनिहाय रिक्त गाळयांची यादी देणार आहोत. या रिक्त गाळयांमध्ये घुसखोरी होणार नाही यादृष्टीने त्यांनी अशा रिक्त गाळयावर एकसारखा पहारा द्यावयाचा आहे.

यावर मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी यांनी असे मत व्यक्त केले की, श्री बाप्पा सावंत हयांच्या मताशी ते सहमत नाहीत. संक्रमण शिबीरातील घुसखोरी रोखण्याचे काम हे जर परिणामकारक होणार असेल तर त्यासाठी जरा जास्त खर्च झाला तरी चालेल.परंतु हे काम परिणामकारक झाले पाहिजे.

यावर सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, प्राप्त झालेल्या प्रस्तावामध्ये जरी दंड आकारण्याची अट नसली तरी आपण करारपत्र करतना ही अट त्यांना घालू शकतो. त्यांनी प्रस्तावात असे नमूद केले आहे की, जर त्यांच्या कालावधीत घुसखोरी झालीच तर अशा घुसखोर रहिवाशांना बाहेर काढण्याची जबाबदारी त्यांची राहील व मंडळाचे गाळे नेहमी रिक्त राहातील हयाची खबरदारी घेतील.

याबाबत मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी यांनी असे प्रतिपादन केले की, वरीलप्रमाणे जर ते लेखी लिहून देत असतील तर लेखी लिहून घ्यावे तसेच यासाठी आपण त्यांना अटकाव करण्यासाठी कार्यवाही करणे आवश्यक आहे व सुरक्षा रक्षक नेमल्यानंतर आपणांस त्याचा परिणाम दिसून आला पाहिजे.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी यांनी उपस्थित केलेला मुद्दा अगदी रास्त असून त्यानुसार मंडळाचे ज्या प्रमाणात नुकसान होईल ते नुकसान त्यांना देय असलेल्या रक्कमेतून वा सुरक्षा अनामत रक्कमेतून वसूल केले जावे. परंतु महत्वाचा मुद्दा असा आहे की, आपण घुसखोरी हया संज्ञेची व्याख्या कशी काय करणार की ज्यामुळे मंडळाचे आर्थिक नुकसान झाले आहे.सदर घुसखोरी एका दिवसासाठी, एका आठवडयासाठी वा एका महिन्यासाठी आहे हयाबाबत आपणास विचार करावा लागेल. समजा एखाद्या व्यक्तीने घुसखोरी करुन तो गाळयामध्ये २-३ दिवसांसाठी राहिल्यानंतर मंडळाने ही गोष्ट त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतर त्यांनी हया घुसखोर व्यक्तीस काढून टाकण्याची कार्यवाही केली तर त्यांनी तत्पर कार्यवाही केली आहे असे समजण्यास हरकत नाही. परंतु आपण ही गोष्ट

त्यांच्या निदर्शनास आणून दिल्यानंतरही जर घुसखोर व्यक्ती ७-१० दिवस गाळयात राहीली तर अशाबाबतीत सकारात्मक दृष्टीकोनातून निर्णय घ्यावा लागेल तसेच मा. सदस्य श्री बाप्पा सावंत यांनी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सुरक्षा रक्षक नेमण्यांचा जो मुद्दा उपस्थित केला आहे त्यानुसार पारदर्शकतेच्या दृष्टीने वर्तमानपत्रात जाहीरात देऊन सुरक्षा रक्षक नेमण्यास कोणतीही अडचण नाही.

यावर मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनी असे प्रतिपादन केले की, जर नोव्हेंबर-१९९८ पासून सुरक्षा रक्षक नेमलेले नाहीत तर सुरक्षा रक्षक नेमण्यासाठी वर्तमानपत्रात जाहीरात देऊन २-३ महिन्यांचा कालावधी गेला तरी त्यास हरकत नसावी.

याबाबत मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, पुनर्बांधणी योजनांच्या बाबतीत असे प्रकार घडलेले आहेत की, आपण जूनी इमारत पाडल्यानंतर जी मोकळी जागा असते त्यांचे संरक्षण करण्यासाठी आपण कार्यवाही करीत नाही. कालांतराने पुनर्बांधणीच्या प्रत्यक्ष कामास विलंब झाल्यानंतर हया मोकळया जागेवर अतिक्रमण झालेले असते. एलफिन्स्टन रोड हया विभागातील पुनर्बांधणी योजनेच्या जागेवरही अशाच प्रकारचे अतिक्रमण झालेले आहे. आपण त्याठिकाणी ५ वर्षेपर्यंत लक्ष न दिल्याने आज अशी परिस्थिती आहे की, शासनाच्या नवीन धोरणानुसार हया झोपडीधारकांना सन १९९५ चा नियम लावून हया झोपडीधारकांनाही आपल्या पुनर्बांधणी योजनेत जागा द्यावी अशी आग्रही मागणी मा. राज्यमंत्री श्री नवाब मलिक हयांनी केली आहे व त्याप्रमाणे त्यांनी निर्णयही घेतला आहे. हे टाळण्यासाठी आपल्या ज्या मालमत्ता आहेत त्यांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने आपली सुरक्षा व्यवस्था असावी ही या प्रस्तावामागची संकल्पना आहे. ही सुरक्षा व्यवस्था आपण जेव्हा अधिकारी वर्गामार्फत करण्याचा प्रयत्न करतो तेव्हा असे निदर्शनास आले आहे की, अधिकारी वर्गाला हे काम करताना संबंधित व्यक्तीकडून या ना त्या प्रकारे विरोध केला जातो तसेच त्यासाठी वेळच्यावेळी पोलीस कुमकही मिळत नाही. म.न.पा. तर्फे आता त्यांच्या मालमत्तांचे संरक्षण करण्याच्या दृष्टीने खाजगी सुरक्षारक्षक नेमण्याची पध्दत सुरु केलेली आहे. प्राधिकरणाने ब-याच ठिकाणी अशी पध्दत सुरु केलेली आहे. त्याच धर्तीवर आपण आपल्या मंडळाच्या मालमत्तांचे रक्षण करण्याच्या दृष्टीने ही संकल्पना आखली असून ती **प्रथमतः आपण प्रायोगिक तत्वावर** संक्रमण शिबीरातील गाळयांमध्ये होणा-या घुसखोरीला आळा घालून मंडळाचे आर्थिक नुकसान टाळण्याच्या दृष्टीने राबविण्याचा विचार आहे. हे करताना आपण हयामध्ये परिणामकारकतेच्या दृष्टीने सुरुवातीला प्रायोगिक तत्वावर ही पध्दती सुरु करणार आहोत. यामध्ये जर आपणाला परिणाम दिसून आला नाही तर आपण ही पध्दती लगेच थांबवू शकतो. निविदा पध्दतीमध्ये अशी शक्यता असते की, निविदा हया संगनमताने भरुन जास्त दर मागितला जातो. त्यामुळे आपण सुरक्षा मंडळाचे जे दर आहेत त्या दरांनुसारच ही पध्दती सुरु करणार आहोत व त्याप्रमाणेच हा प्रस्ताव सादर केलेला आहे.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, प्रायोगिक तत्वावर हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी. भविष्यात जर आपणांस हयाचा परिणाम दिसून आला तर त्याप्रमाणे आपण पुढील विचार करु.

सविस्तर चर्चेअंती मंडळाच्या मालमत्तेच्या संरक्षणाबाबतचा विचार करुन संक्रमण शिबीरातील वसाहतीमध्ये रिक्त गाळयांची घुसखोरी रोखण्यासाठी व संक्रमण शिबीराच्या संरक्षणासाठी मे. हंटर सुरक्षा रक्षक कंपनीने सादर केलेला प्रस्ताव प्रायोगिक तत्वावर सर्वानुमते मंजूर करण्याचे ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५४९

दुरुस्ती व पुनर्रचना मंडळाच्या अखत्यारितील रिक्त गाळे तसेच संक्रमण शिबीरातील वसाहतींचे संरक्षण करण्यासाठी व रिक्त गाळयांतील घुसखोरी रोखण्यासाठी मे. हंटर सुरक्षा रक्षक कंपनीने सादर केलेली निविदा प्रायोगिक तत्वावर सर्वानुमते मंजूर केली.

....

बाब क्रमांक : ७३/५ (ब)

विषय- भूतपूर्व राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत मुंबई बेटावरील पुनर्रचित करण्यात आलेल्या इमारतीमधील निवासी/अनिवासी अतिरिक्त क्षेत्रफळापोटी आकारावयाच्या किंमतीबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र. १०७ ते १२१ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हया विषयाबाबत मा.अध्यक्ष/प्राधिकरण यांचे स्तरावर दि. ३०.१.२००१ रोजी बैठक झाली होती. त्या बैठकीचे इतिवृत्त पृ.क्र.११३ वर सादर करण्यात आले आहे. हया बैठकीमध्ये राजीव गांधी निवारा प्रकल्पांतर्गत पुनर्रचित केलेल्या इमारतींतील जेव्हा आपण अतिरिक्त निवासी/अनिवासी क्षेत्रफळ वाटप करतो त्याचा दर काय असावा याबाबत चर्चा झाली होती. हया इमारती जेव्हा राजीव गांधी निवारा प्रकल्पाकडे होत्या व जेव्हा त्या आपल्या मंडळाकडे हस्तांतरित केल्या त्यावेळी हया इमारतीतील अतिरिक्त निवासी/अनिवासी क्षेत्रफळापोटी किमान दर हा रु. ११५५ प्रति चौ.फू. व जास्तीतजास्त रु. ३३००/- प्रति चौ.फू. दर आकारण्यात आलेला होता. तदनंतर पानवाला चाळ, भंडारी चाळ व श्रॉफ बिल्डिंग हया इमारतीतील अतिरिक्त क्षेत्रफळासाठी शासनाने दि. १७.९.१९९८ रोजीच्या पत्रान्वये रु.१०००/- प्रति चौ.फू. दर निश्चित करुन त्याप्रमाणे अतिरिक्त क्षेत्रफळाचे वाटप करण्याचे आदेश दिलेले आहेत व त्याप्रमाणे हया तीन इमारतींसाठी दर आकारण्यात आला होता.

दि. ३०.१.२००१ रोजी मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या स्तरावर झालेल्या बैठकीमध्ये असे ठरले की, आपल्या उमरखाडी, कामाठीपूरा आणि गिरगांव परिसरात ज्या १२ इमारती आहेत त्यातील २५ रिकाम्या गाळयांसाठी रु.९००/- प्रति चौ.फू. दर निश्चित करण्यात आला आहे. हया दराप्रमाणे आतापर्यंत आपण ९ गाळयांचे वाटप केलेले आहे. अद्याप १६ गाळयांचे वाटप करावयाचे आहे. मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या निर्णयाप्रमाणे जो रु. ९००/- प्रति चौ.फू. दर निश्चीत झाला आहे त्यास मंडळाची कार्योत्तर मंजूरी घेऊन आपल्यास मंजूर असलेला हा प्रस्ताव सादर केला जाईल.

हयाबाबत मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनी असे प्रतिपादन केले की, रहिवाशांची जी एक संघटना आहे त्या संघटनेस हा रु. ९००/- प्रति चौ.फू. दर मान्य आहे. त्यामुळे हा प्रस्ताव मंजूर करण्यास हरकत नसावी.

यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, हया प्रकरणाचे सर्व अधिकार आपल्या मंडळास आहेत. हा जो रु.९००/- प्रति चौ.फू. दर मंजूर केला आहे त्यास त्यांची काही हरकत नाही परंतु हयापूर्वी आपण असे काही निर्णय घेतले आहेत की, ज्यामध्ये आपण काही भाडेवाढ ही **रेडी रिकोनर** दराप्रमाणे आकारली आहे. परंतु तदनंतर आपणाला असे वाटले की, सदर भाडेवाढ उचित नाही त्यामुळे ही भाडेवाढ कमी करण्याचे काम आपल्याला करावे लागणार आहे. माझगांव विभागातील पानवाला चाळ व दुस-या एका इमारतीच्या संदर्भात त्यावेळच्या मुख्य अधिकारी श्रीमती वंदना खुल्लर व रहिवाशांसोबत एक बैठक झाली होती. त्यावेळी जो रु. १८००/- प्रति चौ.फू. दर होता तो आपण रु. १४००-१५०० प्रति चौ.फू. केला होता. हयामध्ये आपली अशी भूमिका होती की, मंडळाला जास्त आर्थिक फटका न बसता रहिवाशांना परवडेल असा दर ठेवावा. हया दोन इमारतींबाबत घेतलेल्या निर्णयानंतर मा. अध्यक्ष/प्रा. यांच्या स्तरावर बैठक होऊन आपण वर दोन इमारतींबाबत घेतलेला निर्णय बाजूला ठेऊन रु. ९००/- प्रति चौ.फू. दर लागू करण्याचा निर्णय घेण्यात आला. हया निर्णयास मी व्यक्तीशः विरोध करणे चुकीचे आहे. कारण हयामध्ये जर रहिवाशांचे हित असेल तर त्यास हरकत नसावी परंतु आपण पूर्वी ज्या रु. १४००/- प्रति चौ.फू.. दराने गाळयांचे वितरण केलेले आहे ते गाळेधारकही रु. ९००/- प्रति चौ.फू. दराची मागणी करण्याची शक्यता आहे. एका गाळयासाठी रु. ९००/- प्रति चौ.फू. व दुस-या गाळयासाठी रु. १४००/- प्रति चौ.फू. ही जी तफावत आहे ती योग्य नाही. त्यामुळे हयाबाबतही विचार होणे आवश्यक आहे.

सहमुख्य अधिकारी यांनी याबाबत असे प्रतिपादन केले की,आता आपण जो निर्णय घेणार आहोत तो १२ इमारतींबाबत घेणार आहोत. हया इमारतींमध्ये निवासी तसेच अनिवासी गाळेही आहेत. हे सर्व गाळे सध्या रिक्त असून हे गाळे घेण्यास कोणी तयार नसल्याने ते ८-१० वर्षांपासून रिक्त आहेत. हयामध्ये अनिवासी गाळा हा निवासी गाळा म्हणूनही देण्याचे प्रस्तावित आहे. जेणेकरुन गाळा विकला जाईल. निवासी गाळे ११ असून अनिवासी गाळे १४ आहेत. सदर अनिवासी १४ गाळे हे इमारतीच्या पाठीमागील भागात असल्यामुळे ते घेण्यास कोणी तयार होत नाही. त्यामुळे सदर अनिवासी गाळे हे निवासी गाळे म्हणून तरी विकले जावेत अशी संकल्पना आहे. अनिवासी गाळयाचा वापर निवासी गाळा म्हणून करुन घेण्याची परवानगी संबंधित रहिवाशाने म.न.पा.कडून घ्यावी अशीही संकल्पना आहे. हया गाळयांना मागणी नसल्याने त्याचा दर कमी करण्याचा प्रस्ताव आहे. मा. सभापती महोदयांनी वर जे प्रतिपादन केले आहे ते श्रॉफ बिल्डिंग हया इमारतीबाबत आहे. श्रॉफ बिल्डिंगमधील अनिवासी गाळयांसाठी आपण रु. १२००/- प्रति चौ.फू. दर आकारलेला आहे. हा दर अतिरिक्त क्षेत्रफळाचा नसून मुळ क्षेत्रफळाचा आहे. तदनंतर हा रु. ८००/- प्रति चौ.फू. करण्यात आला होता. हया प्रस्तावांतर्गत अतिरिक्त क्षेत्रफळापोटी आपण रु. ९००/- प्रति चौ.फू. हा दर प्रस्तावित केला आहे. विठ्ठल विनायक ही जी इमारत आहे त्या इमारतीबाबत मा. अध्यक्ष/प्रा. यांनी घेतलेल्या बैठकीत हया इमारतीतील अनिवासी गाळयापोटी रु. ५७२/- प्रति चौ.फू. दर आकारण्याचा निर्णय घेतला आहे परंतु हया निर्णयाची अंमलबजावणी अद्याप झालेली नसून संबंधित नस्ती मा. अध्यक्ष/प्रा. यांच्याकडे निर्णयासाठी पाठविली आहे.

याबाबत मा.सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, मा. अध्यक्ष/प्रा. यांनी जे निर्णय घेतले आहेत ते रहिवाश्यांच्या हिताच्यादृष्टीने घेतले गेले असल्याने स्वागतार्ह आहेत. परंतु येथे असा प्रश्न निर्माण होतो की, एका रहिवाशाला आकारलेला दर आपण इतर सर्व रहिवाशांना आकारणार का ? हयाचा खुलासा होणे आवश्यक आहे. आता सांगितल्याप्रमाणे जी नस्ती उपाध्यक्ष/प्राधिकरण यांना सादर केली आहे त्या नस्तीतील टिपणीमध्ये हया सर्व गोष्टी नजरेस आणल्या आहेत का ? उपाध्यक्ष/प्रा यांनी जर रु. ५००/- प्रति चौ.फू.हा दर निश्चित केला तर आपण निश्चित केलेला रु. १४००/- प्रति चौ.फू.हा दर चुकीचा होईल. त्यापेक्षा आपणच आपल्या स्तरावर रु. ५००/- प्रति चौ.फू. हा दर निश्चित करणे योग्य होईल. परंतु रु. ५००/- प्रति चौ.फू.हा दर मंडळाला परवडणारा आहे का ? हा प्रश्न उपस्थित होतो.

याबाबत मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनी असे प्रतिपादन केले की, रहिवाशी संघटनेने रु. ९००/- प्रति चौ.फू. हा दर मान्य केला असल्याने आपण त्याप्रमाणे कार्यवाही करण्यास हरकत नाही.

याबाबत मा. सदस्य श्री बाप्पा सावंत यांनी असे प्रतिपादन केले की, मा. सभापती महोदयांनी पूर्वी दर रु. १८००/- प्रति चौ.फू. वरुन रु. १४००/- प्रति चौ.फू.निश्चित केला होता. मात्र तदनंतर प्राधिकरण स्तरावर जर दर रु. ९००/- प्रति चौ.फू. निश्चित झाला असेल तर आपण रु. १४००/- प्रति चौ.फू.निश्चित केलेला दर चुकीचा होईल व रहिवाशांची आपण फसवणुक केल्यासारखे होईल.

हयाबाबत मा. सदस्य श्री विश्वास मोकाशी यांनी असे प्रतिपादन केले की, या विषयाबाबत मा. सभापती, मुख्य अधिकारी व सहमुख्य अधिकारी यांनी एकत्र चर्चा करुन ज्या रहिवाश्यांना रु. १२००/- प्रति चौ.फू. आकारला आहे त्यांच्याबाबतीत काय करावे याबाबत विचार करावा. प्रस्तावांतर्गत जो रु. ९००/- प्रति चौ.फू.दर निश्चित केला आहे त्यास मंजूरी देऊ या.

यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, रु. ९००/- प्रति चौ.फू.हा जो दर प्रस्तावित आहे तो अतिरिक्त क्षेत्रफळापोटी आहे. व रु. १४००/- प्रति चौ.फू.हा दर मात्र अतिरिक्त क्षेत्रफळापोटी नसून मूळ क्षेत्रफळापोटीचा आहे. प्राधिकरण व मंडळ स्तरावर एकाच प्रकरणात वेगवेगळे निर्णय घेणे संयुक्तीक होणार नाही तसेच त्यामुळे आपापसांत गैरसमज निर्माण होण्यास वाव आहे. त्यामुळे कोणतेही दर निश्चित करताना त्यावर मंडळाचे अभिप्राय घेऊनच निश्चित करावा व तदनंतरच हा दर प्रसिध्द करावा. प्राधिकरणाने अगोदर दर निश्चित करुन नंतर त्यास मंडळाची मंजूरी घेण्याची प्रथा योग्य नाही.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हयामध्ये अतिरिक्त क्षेत्रफळाचा दर व मुळ क्षेत्रफळाचा दर असे दोन प्रकार आहेत. प्रस्तावांतर्गत गाळयांना मागणी नाही ही वस्तुस्थिती आहे व त्यामुळे त्यांचा दर कमी करुन तो प्राधिकरणाने रु. ९००/- प्रति चौ.फू.निश्चित केलेला आहे. अनेक इमारतींचे रहिवाशी मा.अध्यक्ष/प्राधिकरण व मा. सभापती/दुवपु यांची व्यक्तीशः भेट घेतात व त्यावेळी दर निश्चित करण्याबाबत चर्चा केली जाते. येथून पुढे दर निश्चीत करताना चर्चेमध्ये जे निर्णय होतात ते निर्णय प्रशासकीयदृष्टया मंडळामार्फत प्राधिकरणास सादर करावेत.

मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, प्रस्तावांतर्गत गाळयांना मागणी नसल्याने व मंडळाला

३२

त्यामधून आर्थिक उत्पन्न होणार असल्याने आपण हा प्रस्ताव मान्य करु या. मात्र येथून पुढे असे निर्णय घेताना त्यामध्ये वेगवेगळया स्तरावर विसंगती होता कामा नये याबाबत काळजी घ्यावी.

वरील सविस्तर चर्चेअंती प्रस्तावांतर्गत १२ इमारतीतील निवासी अतिरिक्त क्षेत्रफळासाठी रु.९००/- प्रति चौ.फू. व अनिवासी अतिरिक्त क्षेत्रफळापोटी रु. २७००/- प्रति चौ.फू. दराने आकारणी करुन वाटप केलेल्या गाळयांस कार्योत्तर मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.-

ठराव क्रमांक : ७३/५५०

प्रस्तावांतर्गत १२ इमारतीतील निवासी अतिरिक्त क्षेत्रफळासाठी रु.९००/- प्रति चौ.फू. व अनिवासी अतिरिक्त क्षेत्रफळासाठी रु. २७००/- प्रति चौ.फू. दराने वाटप केलेल्या गाळयांस कार्योत्तर मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/६ (अ-१)

विषय- इमारत क्र. १६, अली उमर स्ट्रीट, सी-१/२ विभाग हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी मिळणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१२३ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता(द.) यांनी असे प्रतिपादन केले की, हे जूने काम असून हया कामाचे अंतिम देयक अद्याप अदा झालेले नाही. मंजूर प्रशासकीय मान्यतेनुसार दुरुस्ती खर्चाचा दर रु. ४६२.४५ प्रति चौ.मी. होता. परंतु प्रत्यक्ष पूर्ण झालेल्या कामानुसार दुरुस्ती खर्चाचा दर रु. ७१३.११ प्रति चौ.मी. झाला आहे. आपण रु. ७५०/- प्रति चौ.मी. दराप्रमाणे उपकरात वाढही केली आहे. अंतिम देयक अदा करण्याच्यादृष्टीने वाढीव खर्चास मंजूरीची आवश्यकता आहे.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित इमारतीच्या दुरुस्तीसाठी प्रशासकीय मंजूरीपेक्षा अधिक झालेल्या खर्चास मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५५१

इमारत क्र. १६, अली उमर स्ट्रीट, सी-१/२ विभाग हया इमारतीच्या दुरुस्तीसाठी झालेल्या वाढीव खर्चास रु. ७५०/- प्रति चौ.मी. मर्यादेनुसार रु.२,०१,९२२/- इतक्या रक्कमेस सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/६ (अ-२)

विषय- जूनी इमारत क्र.११, महालक्ष्मी टेंपल कंपाऊंड, कुसुम सदन हया इमारतीस म्हाडा अधिनियमांतर्गत कलम ८८(३)(अ) अन्वये प्रमाणपत्र जारी करणेबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१२५ ते १२८ वर सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, रहिवाशांना हया इमारतीची दुरुस्ती करण्याची इच्छा नसून रु. १०००/- प्रति चौ.मी. वरील जादा रक्कम रु.५३००८४/- मंडळाकडे भरण्यास असमर्थता दर्शविली आहे. हयाबाबत मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांनी ही इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ च्या कलम ८८(३)(अ) प्रमाणपत्रान्वये दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे घोषित करण्याची आग्रही विनंती केली आहे. त्यानुसार हा प्रस्ताव मंजूरीसाठी सादर करण्यात आला आहे.

सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव मंजूर करण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५५२

इमारत क्र.११, महालक्ष्मी टेंपल कंपाऊंड, कुसुम सदन ही इमारत प्राधिकरण अधिनियम १९७६ अंतर्गत कलम ८८(३)(अ) प्रमाणपत्रान्वये दुरुस्ती खर्चाच्या प्रमाणित मर्यादेपलिकडे घोषित करावयाच्या प्रस्तावास सर्वानुमते मंजूरी प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/६ (ब)

विषय- दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाब.

सदर प्रस्ताव पृ.क्र.१३१ ते ३५१ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (द.) यांनी असे प्रतिपादन केले की, दक्षिण परिमंडळातील **ऐ** विभागातील ६, **बी** विभागातील १५, **सी१-२** विभागातील २१, **सी३-४** विभागातील **२३**, **डी-१** विभागातील १७ व **डी-२** विभागातील १७ असे एकूण ९९ प्रस्ताव आहेत. त्याशिवाय मा. मंत्री महोदय कार्यालयातून प्राप्त झालेल्या संदेशानुसार आयत्यावेळच्या विषयात एक प्रस्ताव सादर केलेला आहे.

सविस्तर चर्चेअंती दक्षिण परिमंडळातील एकूण १०० इमारतींच्या दुरुस्तीच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपकत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५५३

दक्षिण परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या १०० मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपत्रकांना सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-अ"** नुसार प्रशासकीय मंजूरी सर्वानुमते प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/७

विषय- उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या नकाशे व अंदाजपत्रकांना प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्याबाबत.

सदर प्रस्ताव पृ.क्र.३५३ ते ४३९ वर सादर करण्यात आले आहेत.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (ऊ..) यांनी असे प्रतिपादन केले की, उत्तर परिमंडळातील **ई** विभागातील ११, **फग/द** विभागातील ७, **फग/उ** विभागातील १६, असे एकूण ३४ इमारतींच्या दुरुस्तीचे प्रस्ताव प्रशासकीय मंजूरीसाठी सादर करण्यात आले आहेत.

सविस्तर चर्चेअंती उत्तर परिमंडळातील एकूण ३४ इमारतींच्या दुरुस्तीच्या मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपकत्रकांना प्रशासकीय मंजूरी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५५४

उत्तर परिमंडळातील उपकरप्राप्त इमारतींच्या दुरुस्तीच्या ३४ मूळ व सुधारित नकाशे व अंदाजपकत्रकांना सोबत जोडलेल्या **"परिशिष्ट-ब"**नुसार प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात आली.

बाब क्रमांक : ७३/८

विषय- **मा. अध्यक्षांच्या परवानगीने आयत्यावेळी ठेवावयाचे विषय**

मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, मागील बैठकीमध्ये आपण कुलाबा येथील संक्रमण शिबीरांच्या पुनर्विकासाच प्रस्तावावर चर्चा केली होती. त्यामध्ये असे ठरले होते की, हया प्रस्तावावर पुढील बैठकीत म्हणजे हया बैठकीत सविस्तर चर्चा करु. हयाबाबत प्राधिकरणाने असे आदेश दिले आहेत की,मंडळाच्या सदस्यांचे जे काही अभिप्राय असतील त्या अभिप्रायांचा समावेश करुन प्राधिकरणाच्या येत्या बैठकीत हा प्रस्ताव सादर करावा. मागील बैठकीत हया प्रस्तावाची सविस्तर माहिती त्यांनी दिलेली आहेच. सन्मा. सदस्यांनी त्यांचे जे काही अभिप्राय आहेत ते त्यांनी सभागृहात मांडावेत, अशी त्यांनी विनंती केली.

मा. सदस्य श्री सचिन सावंत यांनी असे प्रतिपादन केले की, सध्या संक्रमण शिबीरात अस्तित्वात असलेल्या ६८८ गाळयांऐवजी फक्त ४४० नवीन गाळे संक्रमण शिबीरासाठी बांधले जाणार आहेत. मागील बैठकीत श्री विश्वास मोकाशी यांनी सांगितल्याप्रमाणे सध्या मुंबईत राहणा-या रहिवाशांसाठी हया संक्रमण शिबीरातील गाळे फार उपयुक्त आहेत परंतु आता सादर झालेल्या प्रस्तावानुसार २४८ कमी गाळे बांधले जाणार आहेत. कमी गाळे बांधण्याचे कारण काय असू शकेल किंवा हे कमी गाळे बांधणे योग्य आहे का ? जुने ६८८ गाळे हया प्रस्तावात बांधण्याची तरतूद का केलेली नाही ? तसेच ही योजना इतक्या घाईने राबविण्याची आवश्यकता म्हाडाला का वाटते ? म्हाडाला आतापर्यंत रु.१०००/- कोटी रुपयांचा फायदा झालेला आहे. प्रस्तावित योजना ही आर्थिक फायदा लक्षात घेऊन हाती घेणार आहोत का ? हया योजनेतून होणा-या आर्थिक रक्कमेचे काही प्रयोजन केले आहे का ? तसेच ही योजना म्हाडा स्वतः करणार आहे वा संयुक्तरित्या करणार आहे ? मागील बैठकीत हया प्रस्तावाच्या अनुषंगाने एक तुलनात्मक तक्ता सादर केला होता. त्यानुसार ही योजना म्हाडाने जर स्वतः राबविली तर म्हाडाला १५६ कोटी रुपयांचा फायदा होईल. जर ही योजना

संयुक्तरित्या केली तर १५३ कोटी रुपयांचा फायदा होईल असे दाखविण्यात आले होते. व्यवहार्य दृष्टीकोनातून विचार केल्यास कोणीही व्यक्ती १०० टक्के फायदा घेण्याचा विचार करेल. ही योजना संयुक्तरित्या राबविण्याचे ठरल्यास त्या दृष्टीकोनातून ही योजना कशी व्यवहार्य होईल याचाही विचार केला पाहिजे. संयुक्तरित्या योजना राबविण्यासाठी आपण दोनदा वर्तमानपत्राव्दारे निविदा मागविल्या असताना त्याला प्रतिसाद मिळालेला नाही ही वस्तुस्थिती आहे. ही योजना नाकारण्याची कारणे काय आहेत याचा विचार केला पाहिजे. सादर केलेल्या प्रस्तावामध्ये फक्त म्हाडाने योजना राबविल्यास त्यातील फायदे व तोटयांचे विश्लेषण दिलेले आहे. परंतु जर ही योजना संयुक्तरित्या राबविली तर त्यामध्ये आर्थिक फायदे व तोटे कसे असतील हयाबाबतचेही विश्लेषण सादर करणे आवश्यक आहे. सादर केलेल्या विश्लेषणानुसार म्हाडाने ही योजना राबविल्यास त्यासाठी रु. १०८/- कोटी खर्च अपेक्षित आहे. एकूण २६४ कोटी रुपयांची उलाढाल होणार आहे.म्हाडाला जर ही योजना राबविण्यास १०८ कोटी रुपये खर्च येत असेल तर संयुक्तरित्या राबविणा-या खाजगी विकासकासही तेवढाच किंबहुना त्यापेक्षा जास्तच खर्च येणार आहे. प्रस्तावात सादर केल्यानुसार आपण येथील गाळे रु. ८०००/- ते रु. १२०००/- प्रति चौ.फू. दराने विकू शकू असे दाखविले आहे. परंतु हया दराप्रमाणे त्या दर्जाचे बांधकाम आपण देऊ शकू का ? वर्तमानपत्रामध्ये जे मालमत्तांचे दर प्रसिध्द होतात त्यानुसार कुलाबा विभागामध्ये जागेचा दर रु. १३०००/- प्रति चौ.फू. आहे जो कमीही होऊ शकतो. हिरानंदानी, रहेजा यांच्यासारखे जे नावाजलेले विकासक आहेत त्यांना हया भागात हा दर मिळू शकतो. परंतु आपणाला दोन निविदा मागवूनही त्यास प्रतिसाद मिळू शकलेला नाही. हयावरुन अशी शक्यता वाटते की म्हाडाला रु. ८०००/- ते रु. १२०००/- प्रति चौ.फू. दर प्राप्त होईल का ? पवई हयाठिकाणी आपण ज्या सदनिका बांधल्या आहेत त्याबाबत आपणा सर्वांना माहीतच आहे की, हया ठिकाणी सुरुवातीला आपण रु. २७००/- प्रति चौ.फू.दर ठेवला होता. त्यास अपेक्षित प्रतिसाद प्राप्त न झाल्याने हा दर आपण रु. २४००/- प्रति चौ.फू. व तदनंतर रु. २१००/- प्रति चौ.फू. केला आहे. शिर्के यांनी महालक्ष्मी येथे एक योजना राबविली आहे. त्याचे बांधकाम चांगले आहे परंतु आतील जो दर्जा आहे तो आपण हया प्रस्तावित दराप्रमाणे देऊ शकू का ? आपण हिरानंदानी किंवा रहेजा हया विकसकांच्या बांधकामचा दर्जा निर्माण करु शकू का ? हे करताना आपणास कोणाबरोबर स्पर्धा करावयाची आहे याचाही विचार होणे आवश्यक आहे. ही योजना संयुक्तरित्या राबविण्याच्यादृष्टीने अजिबात व्यवहार्य नाही. त्यामुळे म्हाडाने स्वतः योजना राबविण्याचे ठरविल्यास त्यादृष्टीने बांधकामाचा दर्जा राखण्याबाबत विचार होणे आवश्यक आहे. संयुक्तरित्या योजना राबविण्याचे ठरविल्यास आपणाबरोबर जे खाजगी विकासक ही योजना राबवतील त्यांच्यादृष्टीने ही योजना व्यवहार्य आहे किंवा नाही हाही विचार होणे आवश्यक आहे. हया योजनेमधून जर काही तोटा झाला तर त्याची जबाबदारी कोण घेणार आहे ?रु. १३०००/- प्रति चौ.फू.दराप्रमाणे विचार केल्यास २,४०,००० चटईक्षेत्राच्या विक्रीतून म्हाडाला ३१२ कोटी रुपये प्राप्त होणार आहे. हया योजनेमध्ये म्हाडाची एकूण रु. २६४ कोटीची उलाढाल लक्षात घेता संयुक्तरित्या ही योजना राबविल्यास खाजगी विकासकास फक्त ४८ कोटी रुपये नफा मिळणार आहे. ही योजना राबविण्यासाठी लागणारा कालावधी, त्यामध्ये गुंतवावा लागणारा आर्थिक निधी व हया निधीवरील व्याजाचा विचार करता संयुक्तरित्या ही योजना राबविणे व्यवहार्य होणार नाही आणि यामुळेच दोनवेळा निविदा मागविल्यानंतरही त्यास प्रतिसाद

मिळालेला नाही. प्रतिसाद न मिळण्याची कारणे शोधून त्यांचा अभ्यास केल्यानंतर जर आपणांस वाटले की, ही योजना व्यवहार्य आहे तर त्यावेळेस ही योजना राबविण्यास हरकत नाही.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, मा. सदस्य श्री सचिन सावंत यांनी २-३ मुद्दे व्यवस्थीतरित्या उपस्थित केलेले आहेत. हे मुद्दे सूचना स्वरुपात आपण प्राधिकरणास पाठवू. अशाच प्रकारचे मुद्दे प्राधिकरणाच्या बैठकीत सन्मा. सदस्यांनीही पूर्वी उपस्थित केलेले आहेतच.हया प्रस्तावावर गेल्या ६-७ महिन्यांपासून वेगवेगळया दृष्टीकोनातून आता उपस्थित केलेल्या मुद्दयांवर चर्चा झालेली आहे. प्राधिकरणाच्या दोन बैठकीत हया प्रस्तावावर विचारविनीमय झालेला होता व त्यानुसारच वर्तमानपत्रात जाहीरात देऊन निविदा मागविण्यात आल्या होत्या. हया निविदांना प्रतिसाद मिळालेला नाही हा मुद्दा ठीक आहे परंतु हया प्रस्तावावर निर्णय घेण्याचे अधिकार प्राधिकरणास असल्याने ते सांगोपांग विचार करुनच निर्णय घेतील. प्राधिकरणाला जो १०००/- कोटी रुपयांचा फायदा झाला आहे तो अशा योजना हाती घेऊन राबविल्यानेच झाला आहे. आर्थिक दृष्टीकोनातून प्राधिकरण स्तरावर निर्णय घेण्याचा अधिकार आहे. आता प्राधिकरणाने बांद्रा संक्रमण शिबीरासाठीही अशी योजना राबविण्याच्यादृष्टीने प्रस्ताव आपल्या मंडळाकडून मागविलेला आहे. प्राधिकरणाचा हयामागील उद्देश एवढाच आहे की, ज्या ज्याठिकाणी चटईक्षेत्र उपलब्ध आहे त्या त्या ठिकाणी हया चटईक्षेत्राचा वापर करुन योजना राबवाव्यात जेणेकरुन प्राधिकरणाला त्यातून आर्थिक उत्पन्न मिळेल.

मुख्य अधिकारी यांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, प्राधिकरणाची जी २८ एप्रिल २००१ मध्ये बैठक झाली त्या बैठकीला ते उपस्थित होते. त्या बैठकीत हया प्रस्तावावर अतिशय सविस्तर चर्चा झाली आहे. हया चर्चेमध्ये कॅश इन्फलो, आऊटफलो काय असेल, प्राधिकरणाला कशाप्रकारे किती रुपयांचे आर्थिक उत्पन्न मिळणार आहे हयावर अगोदरच चर्चा झालेली आहे व हया चर्चेच्या अनुषंगानेच जाहीरात देऊन निविदा मागविल्या होत्या. परंतु त्यास प्रतिसाद न मिळाल्याने प्राधिकरणाला हयाबाबत नव्याने विचार करावा लागणार आहे.

दरम्यानच्या काळात मंडळाची स्थापना झाल्याने हया प्रस्तावावर मंडळाच्या सदस्यांचे अभिप्राय जाणून घेण्यासाठी हा प्रस्ताव मंडळापुढे सादर केला आहे. आता जे अभिप्राय प्राप्त झाले आहेत त्या अभिप्रायांसह हा प्रस्ताव आपण प्राधिकरणापुढे सादर करण्यास काहीच हरकत नसावी. मात्र हा प्रस्ताव पाठविताना त्यामध्ये प्रकर्षाने उल्लेख करावा की, मंडळाच्या सदस्यांच्या अभिप्रायांनुसार आता अस्तित्वात असलेल्या गाळयांच्या संख्येइतकेच म्हणजे एकूण ६८८ गाळे संक्रमण शिबीर म्हणून बांधावेत व त्यानुसार विक्रीसाठी उपलब्ध असलेले चटईक्षेत्र कमी करावे.

हयाबाबत उपमुख्य अभियंता (सं.शि.) यांनी असे प्रतिपादन केले की, हया ६८८ संक्रमण गाळयांपैकी ७० गाळे अगोदरच पाडण्यात आलेले आहेत. आजमितीस अधिकृत गाळे फक्त ४८१ आहेत. आपण जर ६० टक्के गाळे इ.डब्ल्यू.एस. खाली बांधले तर आपणास २० टक्के अतिरिक्त चटईक्षेत्र मिळते. त्यामुळे हया प्रस्तावात आपण ४४० संक्रमण गाळे प्रस्तावित केले आहेत. हयाशिवाय आपण मागे एक समिती गठीत करुन अर्हताप्राप्त ठेकेदारांची यादी निवडली आहे. २८ ठेकेदारांपैकी आपण १० ठेकेदार नियुक्त केलेले आहेत जे

नावाजलेले ठेकेदार आहेत. व मंडळाने ही योजना राबविण्याचे ठरविल्यास आपण हया ठेकेदारांमार्फतच ही योजना राबविण्याचा प्रस्ताव आहे.

हयाबाबत मुख्य अधिकारी यांनी असे मत प्रदर्शित केले की, वरील अभिप्रायांसह व सांख्यिकी माहितीसह सविस्तर प्रस्ताव प्राधिकरणास सादर करावा.

मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनीही हा प्रस्ताव प्राधिकरणास सादर करण्यात यावा असे मत प्रदर्शित केले. तसेच त्यांनी असेही प्रतिपादन केले की, हया स्पर्धात्मक युगात जम बसविण्याच्या दृष्टीने म्हाडाने ही योजना साकार करुन दाखविणे आवश्यक आहे. ही योजना म्हणजे म्हाडाचे एक स्वप्न आहे असे म्हणण्यास काही हरकत नाही.

वरील सविस्तर चर्चेअंती सदर प्रस्ताव अभिप्रायांसह व सांख्यिकी माहितीसह प्राधिकरणास सादर करण्याचे सर्वानुमते ठरले.

....

ठराव क्र.७३/५५५

कफ परेड कुलाबा येथील संक्रमण शिबीराच्या पर्नविकासांतर्गत खुल्या बाजारात विक्रीसाठी उंच बहुमजली निवासी इमारत बांधण्याबाबत सध्या अस्तित्वात असलेले संक्रमण शिबीरातील गाळे कमी न करता ते सन्मा.सदस्यांनी सुचविलेल्या सूचनांची नोंद घेऊन सविस्तर बाब टिप्पणी प्राधिकरणाच्या आगामी बैठकीपुढे सादर करावी.

तदनंतर मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, बांद्रा संक्रमण शिबीराबाबतही प्राधिकरणाने प्रस्ताव मागितला असून तो सध्या प्रारुप स्थितीत आहे. हयाबाबत त्यांनी माहिती मागविली असून कुलाबासंक्रमण शिबीराच्या प्रस्तावाच्या धर्तीवरच आपण माहिती सादर करणार आहोत. याबाबतची माहिती आपणाकडे सादर केलेली आहेच.

उपमुख्य अधिकारी (सं.शि.) यांनी माहिती देताना सांगितले की, पश्चिम द्रुतगती महामार्गापासून बांद्रा रेल्वे स्टेशनकडे जाणारा जो अनंत काणेकर मार्ग आहे त्या रस्त्याच्या दोन्ही बाजूला मंडळाचे संक्रमण शिबीर आहे. हया संक्रमण शिबीरात तळमजल्याचा चाळी असून त्यात ३२१ गाळे आहेत. हया संक्रमण शिबीराच्या भोवतालच्या जागेवर (जी जागा मुंबई मंडळाच्या मालकीची आहे) ४४८ झोपडपट्टया आहेत. आपण ही योजना संक्रमण शिबीरासाठी किंवा झोपडपट्टीसाठी स्वतंत्रपणे राबवू शकत नाही. त्यामुळे आपण हा संयुक्त प्रस्ताव राबविणार असून विकासक एस.आर.ए. योजनेंतर्गत ७० टक्के झोपडपट्टीधारकांची संमती मिळवेल अशा विकासकामार्फत ही योजना राबविण्याचे प्रस्तावित आहे व त्याप्रमाणे आपण प्राधिकरणास प्रस्ताव सादर करीत आहोत.

यावर मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी यांनी अशी सूचना केली की, म्हाडामध्ये जर कोणी अधिकारी काही निमित्ताने बाहेरगावाहून आले तर त्यांच्या राहण्याच्या व्यवस्थेसाठी हया योजनेत काही तरतुद करता येत असेल तर ती करावी. कारण ही जागा म्हाडा कार्यालयाला लागूनच आहे. ही माहिती प्राधिकरणाच्या सदस्यांना असून तेही हा मुद्दा उपस्थित करणार आहेतच.

सविस्तर चर्चेअंती बांद्रा संक्रमण शिबीराबाबत प्राधिकरणाने मागविलेली माहिती प्राधिकरणास सादर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

....

विषय- बावला कंपाऊंड दत्ताराम लाड मार्ग, लालबाग येथील पुनर्रचना योजना.

आयत्यावेळच्या विषयात उपमुख्य अभियंता (पुनर्र.) श्री.वणीकर यांनी बावला कंपाऊंड येथील पुनर्बांधणी योजनेबाबत सविस्तर टिप्पणी मा.अध्यक्षांच्या परवानगीने सर्व सदस्यांना सादर करुन असे प्रतिपादन केले की, ही जागा सन १९७७ पासून मंडळाच्या ताब्यात आहे. हया जागेवर ४ इमारती आहेत व ५ मोठे गोडाऊन आहेत. हया जागेवर एकूण २४३ निवासी अधिक ३४ अनिवासी असे एकूण २७७ गाळे आहेत. हया पुनर्बांधणी योजनेचे नकाशे सुरुवातीला १९७९ मध्ये किमान १२० चौ.फू. क्षेत्रफळाच्या गाळयाप्रमाणे मंजूर करण्यात आले होते. १९८६ मध्ये पुन्हा १६० चौ.फू. क्षेत्रफळाप्रमाणे नकाशे सुधारित करण्यात आले ज्यामध्ये तेथे असलेल्या शाळेसाठी स्वतंत्र इमारत बांधण्याचे प्रस्तावित होते. १९९१ मध्ये पुन्हा १८० चौ.फू. क्षेत्रफळाप्रमाणे नकाशे सुधारित करावे लागले. कारण त्यावेळी किमान १८० चौ.फू. क्षेत्रफळाचा गाळा बांधण्याचे धोरण निश्चित झाले होते. १९९४ मध्ये एका इमारतीच्या पुनर्बांधणी कामासाठी आपण निविदा मागवून काम सुरु करण्याचा प्रयत्न केला गेला. परंतु रहिवाशांनी त्यास विरोध करुन ना.ह.प्र.पत्रांतर्गत पुर्नविकास करण्याची इच्छा व्यक्त केली. १९९५ मध्ये पुन्हा किमान २२५.०० चौ.फू. क्षेत्रफळाप्रमाणे नकाशे सुधारित करुन रहिवाशांबरोबर अनेक बैठका घेऊन त्यांच्याशी चर्चा करण्यात आली. परंतु रहिवाशांनी त्यासही काही प्रतिसाद दिला नाही. त्यांनी त्यावेळी सांगितल्यानुसार इ.क्र.४ फारच मोडकळीस आली असल्याने दुरुस्त करुन देण्याची मागणी केल्यानुसार ही इमारत नियमांत नसताना आपण दुरुस्त करुन दिली आहे. तदनंतर अनेक वेळा रहिवाशांबरोबर बैठका घेऊनही रहिवाशी मंडळाने तयार केलेल्या नकाशांना या ना त्या प्रकारे विरोध करीत आहेत. नवीन धोरणांनुसार आपण फेब्रुवारी १९९९ मध्ये २२५.०० चौ.फू. क्षेत्रफळाप्रमाणे नियोजित इमारतीचे नकाशे आपण म.न.पा.कडून मंजूर करुन घेतले आहेत. हया नकाशांप्रमाणे आपणांस ३६५ गाळे अतिरिक्त उपलब्ध होणार आहेत. हे नकाशे प्रकाशाची व्यवस्था वगैरे दृष्टीने अतिशय चांगले असून त्यानुसार आपण एका इमारतीच्या बांधकामास त्वरित सुरुवातही करु शकतो. एका इमारतीसाठी आपण निविदा मागवून ठेकेदारही निश्चित केला आहे व तद्नंतर हया योजनेचा उद्घाटन समारंभ मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या हस्ते करण्यात आला आहे. परंतु रहिवाशांनी मंडळाने तयार केलेले नकाशे योग्य नसल्याचे सांगून पुनर्बांधणी कामास सुरुवात करु दिली नाही. काही रहिवाशांनी सन्मा. सदस्य श्री संजय शिर्के हयांच्यामार्फत अशी विनंती केली आहे की, हया योजनेचे नकाशे मानखूर्द येथील योजनेप्रमाणे तयार करावेत. त्याप्रमाणे नकाशे तयार केल्यानंतर असे आढळून आले की, हया योजनेत मंडळाला मंजूर झालेल्या नकाशानुसार उपलब्ध होणा-या अतिरिक्त ३६५ गाळयांपैकी ८६ अतिरिक्त गाळे कमी उपलब्ध होतील. मंजूर झालेले नकाशे जे आहेत ते प्रकाशव्यवस्था वगैरे दृष्टीकोनातून योग्य आहेत परंतु हे मंजूर नकाशे रहिवाशांना मान्य नाहीत. सन्मा. सदस्यांनी सांगितल्यानुसार रहिवाशांच्या मागणीप्रमाणे नकाशे तयार करावे लागतील परंतु त्यामुळे अतिरिक्त गाळयांपैकी ८६ गाळे कमी उपलब्ध होत असल्याने मंडळाचे अंदाजे रु. ३/- कोटीचे

नुकसान होणार आहे. हया परिस्थितीत काय निर्णय घ्यावा हयासाठी ही बाब सभागृहापुढे सादर केलेली आहे. हयाबाबत सन्मा. सदस्य श्री संजय शिर्के हयांनी असे प्रतिपादन केले की, नवीन तयार केलेल्या नकाशांमुळे जरी ८६ अतिरिक्त गाळे कमी उपलब्ध होणार असतील तरीही २८१ गाळे मंडळाला अतिरिक्त उपलब्ध होत आहेत. ही योजना अगोदरच १२ वर्षांपासून रेंगाळली असल्याने आता ती मार्गी लावण्यासाठी रहिवाशांनी संमती दिलेल्या नकाशानुसार ही योजना राबविण्यास हरकत नसावी.

यावर मुख्य अधिकारी यांनी अशी विचारणा केली की, आपण जर संपूर्ण चटईक्षेत्र वापरणार आहोत तर त्यामध्ये अतिरिक्त गाळयांची संख्या कमी कशी होऊ शकते ?

याबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असा खुलासा केला की, आपण जरी संपूर्ण चटईक्षेत्राचा वापर करणार असलो तरी, रचनेतील बदलामुळे सार्वजनिक पॅसेज व जिना हयासाठी जास्त चटईक्षेत्र वापरला जाणार आहे. त्यामुळे गाळयांचे चटईक्षेत्र कमी होणार असल्याने अतिरिक्त गाळे कमी होणार आहेत.

यावर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, ही योजना गेल्या अनेक वर्षांपासून रखडलेली आहे. मा. अध्यक्ष/प्राधिकरण यांच्या हस्ते भूमिपूजन समारंभ होऊनही रहिवाशांनी मंडळास काम करु दिलेले नाही. याबाबत रहिवाशांना बोलाऊन त्यांच्याशी चर्चा केली असता रहिवाशांनी मंजूर नकाशानुसार गाळयांमध्ये खेळती हवा राहणार नसल्याने व पुरेसा प्रकाश येणार नसल्याने नकाशे बदलण्याची विनंती केली होती व त्यानुसार त्यांना त्यांच्या वास्तुशास्त्रज्ञामार्फत नकाशे सादर करण्यास सांगितले होते. रहिवाशांनी सादर केलेले नकाशे व मंडळाने तयार केलेले नकाशे यांची तुलना केल्यानंतर असे दिसून येते की, हया नवीन नकाशांनुसार योजना राबविली तर मंडळास मंजूर नकाशांनुसार उपलब्ध होणा-या अतिरिक्त गाळयांपैकी ८६ गाळे कमी उपलब्ध होतील. पूर्वानुभवानुसार मंडळाने मंजूर केलेल्या नकाशांनुसार ही योजना रहिवाशांच्या विरोधामुळे मार्गी लागणार नाही ही वस्तुस्थिती आहे. व या परिस्थितीत मंडळ तेथे एकही गाळा बांधू शकत नाही. अशापरिस्थितीत ही योजना मार्गी लावण्याच्यादृष्टीने, जरी मंडळास ८६ अतिरिक्त गाळे कमी उपलब्ध होत असले तरी, रहिवाशांनी सुचविल्यानुसार नवीन नकाशांप्रमाणे ही योजना राबवावी. हे करताना अतिरिक्त गाळयांची रचना ही आपण आपल्या नकाशांनुसार एका स्वतंत्र इमारतीमध्ये करुया जेणेकरुन जास्तीतजास्त अतिरिक्त गाळे मंडळास उपलब्ध होतील. हयामुळे ४०-५० अतिरिक्त गाळे कमी होतील व त्यानुसार ही योजना राबविण्यास काही हरकत नसावी व त्याप्रमाणे नकाशे तयार करण्यास संबंधित अधिका-यांना सूचना दिल्या आहेत.

याबाबत उपमुख्य अभियंता (पुनर्र.) यांनी असे प्रतिपादन केले की, याबाबत वास्तुशास्त्रज्ञांनी प्रयत्न केलेला आहे. वास्तुशास्त्रज्ञांनी केलेल्या चर्चेनुसार आता ८६ ऐवजी ६७ अतिरिक्त गाळे गाळे कमी होणार आहेत. याबाबत पुन्हा फेरतपासणी करण्याच्या सूचना वास्तुशास्त्रज्ञांना दिल्या आहेत.

यावर मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, ही योजना मार्गी लागण्याच्या दृष्टीने रहिवाशांच्या विनंतीनुसार नकाशे तयार करण्यास हरकत नसावी परंतु याबाबत वास्तुशास्त्रज्ञांनी फेरविचार करुन जास्तीतजास्त अतिरिक्त गाळे मंडळाला उपलब्ध होतील अशात-हेने नकाशे रहिवाशांच्या संमतीने करावेत.

सविस्तर चर्चेअंती विषयांकित योजना मार्गी लागण्याच्या दृष्टीने रहिवाशांच्या विनंतीनुसार तसेच मंडळास जास्तीत जास्त अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील अशा दृष्टीने नकाशे सुधारित करुन त्यास

२९

महानगरपालिकेकडून मंजूरी घेऊन पुढील पुनर्बांधणीची कार्यवाही लवकरात लवकर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्याचे ठरले

ठराव क्र.७३/५५६

बावला कंपाऊंड, दत्ताराम लाड मार्ग, लालबाग येथील पुनर्बांधणी योजना मार्गी लागण्याच्या दृष्टीने रहिवाशांच्या विनंतीनुसार मंडळास जास्तीत जास्त अतिरिक्त गाळे उपलब्ध होतील, अशा दृष्टीने नकाशे सुधारित करुन त्यास महनगरपालिकेची मंजूरी घेऊन पुढील पुनर्बांधणीची कार्यवाही लवकरात लवकर करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

तदनंतर आयत्यावेळच्या विषयामध्ये मा. अध्यक्षांच्या परवानगीने खालील विषयांबाबत चर्चा झाली.

विषय- मुंबई बेटावरील **अ** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासाठी ना.ह.प्र.पत्र प्रदान करण्याबाबतचे प्रस्ताव.

---

१. भूकर पहाणी क्र.२४७, परेल शिवडी विभाग,उपकर क्र.एफ २७२३ (१) व २७२३ (२), इ.क्र. २९-बी,२९-सी, परेल व्हिलेज, परेल, मुंबई येथील **लक्ष्मी नारायण मयेकर चाळ** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

२. भुकर पहाणी क्र.२२२५ भुलेश्वर विभाग,इ. क्र.१० व १०-अे, धसवाडी, उपकर क्र.सी ४३७९(१) व (२) मुंबई येथील “अग्रवाल बिल्डिंग” म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

३. अंतिम भूखंड क्र.९६१, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, उपकर क्र.जी-२७९५,(१ए) व जी-२८०२ (२-३), इ.क्र.१०, काकासाहेब गाडगीळ मार्ग व २९-२६७बी, गोखले रोड (द.)मुंबई येथील **मुडेवाडी** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

४. अंतिम भूखंड क्र.१०४, नगररचना योजना क्र.६, माहीम विभाग, उपकर क्र.जीएन-४१८४(५) ४१८५(१) ४१८५(२) ४१८४(३ए) ४१८५(४) ४१८५(३) ४१८५(५) ४१८४(५ए) इ.क्र.२९२-२९२ए, २९४ए, २९०, २९६, एल.जे.रोड व २८६ए, २८८-ए, २९०, २९३, ५, ५ए, ७ए, ७बी, गणेश पेठ लेन, मुंबई येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

५. भुकर पहाणी क्र.५०९ ए/१०, माटुंगा विभाग भूखंड क्र. १६ (उत्तर) दादर माटूंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन ७८२३(८) इ.क्र.०४, ब्राम्हणवाडी, माटूंगा (पू), के. सुब्रमण्यम रोड, मुंबई येथील **अजित बिल्डिंग** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत. ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

६. अंतिम भूखंड क्र.३५५, नगररचना योजना क्र.३, माहीम विभाग, उपकर क्र.जीएन-५५८७(३), इ.क्र.३२, मोगल लेन, माहिम, मुंबई-४०००१६ येथील मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

७. भुकर पहाणी क्र.१९१/१०माटुंगा विभाग, भूखंड क्र. २१९, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ-७०५८(१०), इ.क्र.२१, सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी, मुंबई येथील **दत्त मंदिर हाऊस** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

८. भुकर पहाणी क्र.४७४/१०माटुंगा विभाग, भूखंड क्र. ७६, दादर माटुंगा स्ट्रीट, विभाग क्र. एफ.एस.७९७३(९), इ.क्र.१३, सायन रोड/भाऊ दाजी रोड,माटुंगा, मुंबई येथील **हिरा निवास** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

९. भुकर पहाणी क्र.३००७,भुलेश्वर विभाग उपकर क्र. सी-६५९५,इ.क्र.६-८-१०, पहिली कारपेंटर स्ट्रीट, मुंबई येथील **चिक्कीवाला बिल्डिंग** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

१०. भुकर पहाणी क्र.२०३३,भुलेश्वर विभाग, इ.क्र.७, २री फणसवाडी, उपकर क्र. ४७८८-४६६८, मुंबई येथील **सियाल हाऊस** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

११. अंतिम भूखंड क्र.१०६२, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, उपकर क्र.जी-२७९५,(१ए) व जी-३०२३(३), इ.क्र.६१ए, स्टँडर्ड मिल लेन ,. न्यू प्रभादेवी, मुंबई येथील **तेलवाडी चाळ** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

१२. अंतिम भूखंड क्र.४७०, नगररचना योजना क्र.३, माहीम विभाग, उपकर क्र.जी-५७९८(४-५) ५७९८(१) ५७९८(२) ५७९८(३), इ.क्र.४, ६, ६बी, एल.जे.रोड, व पितांबर लेन मधील रोड व २४७,डी, अप्पर माहिम, मुंबई येथील **लाजकमल** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

१३. भुकर पहाणी क्र.१०४१, १/१०४१, व १०४२ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-१८७५(१),२०११, १८७४(२), २०३८(१), इ.क्र.२०६ए, ७६,७६-ए, खेतवाडी मेन रोड, ७४,७६-बी, खेतवाडी, १०वी गल्ली, ५/३९, खेतवाडी, ११वी गल्ली, मुंबई. येथील **लक्ष्मी बिल्डिंग, मार्कर बिल्डिंग,** आणि **कृष्णा बिल्डिंग** म्हणून ओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

१४. भुकर पहाणी क्र.८५,लोअर परेल विभाग, उपकर क्र. जी-२३६३(१),(२),(३),(४),(५),(६) व (७), इ.क्र. ३२७-२९-३२९-ए,३३३-३३५ए, ३३५-३३५ए, ३३७-३३७ए, ३३१एफ, ३३१इ, ३३१डी, ३३१सी, ३३१बी व ३३१ए, ना.म.जोशी मार्ग, मुंबई येथील **बोहरी चाळ** म्हणूनओळखल्या जाणा-या मालमत्तेच्या पुनर्विकासासाठी ना.ह.प्र. पत्र देणेबाबत.

वरील प्रस्तावांबाबत मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, हया सर्व प्रस्तावांमध्ये नियमाप्रमाणे ७० टक्के भाडेकरु/रहिवाशांची संमती असून मालमत्ताधारक/विकासक/मुख्त्यारपत्रधारक यांनी आवश्यक कागदपत्रांची पूर्तता केली आहे.

सविस्तर चर्चेअंती मुंबई बेटावरील **अ** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुनर्विकासासाठी **ना हरकत प्रमाणपत्र** प्रदान करण्याच्या उपरोक्त १४ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून परवानगी देण्याचे सर्वानुमते ठरले.

ठराव क्रमांक : ७३/५५७

मुंबई बेटावरील **अ** वर्गातील उपकरप्राप्त इमारतींच्या पुर्नविकासासाठी घरमालक/भाडेकरु/विकासक यांच्याकडून प्राप्त झालेल्या खालील १४ प्रस्तावांना प्रस्तावात नमूद केलेल्या अटी व शर्तींच्या आधीन राहून **ना हरकत प्रमाणपत्र** प्रदान करण्यास सर्वानुमते मंजूरी देण्यात आली.

१. भूकर पहाणी क्र.२४७, परेल शिवडी विभाग,उपकर क्र.एफ २७२३ (१) व २७२३ (२), इ.क्र. २९-बी,२९-सी, परेल व्हिलेज, परेल, मुंबई येथील **लक्ष्मी नारायण मयेकर चाळ** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
२. भुकर पहाणी क्र.२२२५ भुलेश्वर विभाग,इ. क्र.१० व १०-अे, धसवाडी, उपकर क्र.सी ४३७९(१) व (२) मुंबई येथील "अग्रवाल बिल्डिंग" म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
३. अंतिम भूखंड क्र.९६१, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, उपकर क्र.जी-२७९५,(१ए) व जी-२८०२ (२-३), इ.क्र.१०, काकासाहेब गाडगीळ मार्ग व २९-२६७बी, गोखले रोड (द.)मुंबई येथील **मुडेवाडी** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
४. अंतिम भूखंड क्र.१०४, नगररचना योजना क्र.६, माहीम विभाग, उपकर क्र.जीएन-४१८४(५) ४१८५(१) ४१८५(२) ४१८४(३ए) ४१८५(४) ४१८५(३) ४१८५(५) ४१८४(५ए) इ.क्र.२९२-२९२ए, २९४ए, २९०, २९६, एल.जे.रोड व २८६ए, २८८-ए, २९०, २९३, ५, ५ए, ७ए, ७बी, गणेश पेठ लेन, मुंबई येथील मालमत्ता.
५. भुकर पहाणी क्र.५०९ ए/१०, माटुंगा विभाग भूखंड क्र. १६ (उत्तर) दादर माटूंगा इस्टेट, विभाग क्र. एफएन ७८२३(८) इ.क्र.०४, ब्राम्हणवाडी, माटूंगा (पु), के. सुब्रमण्यम रोड, मुंबई येथील **अजित बिल्डिंग** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
६. अंतिम भूखंड क्र.३५५, नगररचना योजना क्र.३, माहीम विभाग, उपकर क्र.जीएन-५५८७(३), इ.क्र.३२, मोगल लेन, माहिम, मुंबई-४०००१६ येथील मालमत्ता.
७. भुकर पहाणी क्र.१९१/१०माटुंगा विभाग, भूखंड क्र. २१९, दादर माटुंगा इस्टेट, विभाग क्र. एफ-७०५८(१०), इ.क्र.२१, सर भालचंद्र रोड, हिंदू कॉलनी, मुंबई येथील **दत्त मंदिर हाऊस** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
८. भुकर पहाणी क्र.४७४/१०माटुंगा विभाग, भूखंड क्र. ७६, दादर माटुंगा स्ट्रीट, विभाग क्र. एफ.एस.७९७३(९), इ.क्र.१३, सायन रोड/भाऊ दाजी रोड,माटुंगा, मुंबई येथील **हिरा निवास** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
९. भुकर पहाणी क्र.३००७,भुलेश्वर विभाग उपकर क्र. सी-६५९५,इ.क्र.६-८-१०, पहिली कारपेंटर स्ट्रीट, मुंबई येथील **चिक्कीवाला बिल्डिंग** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.
१०. भुकर पहाणी क्र.२०३३,भुलेश्वर विभाग, इ.क्र.७, २री फणसवाडी, उपकर क्र. ४७८८-४६६८, मुंबई येथील **सियाल हाऊस** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

११. अंतिम भूखंड क्र.१०६२, नगररचना योजना क्र.४, माहीम विभाग, उपकर क्र.जी-२७९५,(१ए) व जी-३०२३(३), इ.क्र.६१ए, स्टँडर्ड मिल लेन , न्यू प्रभादेवी, मुंबई येथील **तेलवाडी चाळ** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

१२. अंतिम भूखंड क्र.४७०, नगररचना योजना क्र.३, माहीम विभाग, उपकर क्र.जी-५७९८(४-५) ५७९८(१) ५७९८(२) ५७९८(३), इ.क्र.४, ६, ६बी, एल.जे.रोड, व पितांबर लेन मधील रोड व २४७,डी, अप्पर माहिम, मुंबई येथील **लाजकमल** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

१३. भुकर पहाणी क्र.१०४१, १/१०४१, व १०४२ गिरगांव विभाग, उपकर क्र. डी-१८७५(१),२०११, १८७४(२), २०३८(१), इ.क्र.२०६ए, ७६,७६-ए, खेतवाडी मेन रोड, ७४,७६-बी, खेतवाडी, १०वी गल्ली, ५/३९, खेतवाडी, ११वी गल्ली, मुंबई. येथील **लक्ष्मी बिल्डिंग, मार्कर बिल्डिंग,** आणि **कृष्णा बिल्डिंग** म्हणून ओळखल्या जाणारी मालमत्ता.

१४. भुकर पहाणी क्र.८५,लोअर परेल विभाग, उपकर क्र. जी-२३६३(१),(२),(३),(४),(५),(६) व (७), इ.क्र. ३२७-२९-३२९-ए,३३३-३३५ए, ३३५-३३५ए, ३३७-३३७ए, ३३१एफ, ३३१इ, ३३१डी, ३३१सी, ३३१बी व ३३१ए, ना.म.जोशी मार्ग, मुंबई येथील **बोहरी चाळ** म्हणून ओळखली जाणारी मालमत्ता.

....

तदनंतर आयत्यावेळच्या विषयांमध्ये पिंपळेशवर कृपा हया इमारतीच्या गाळे वाटपाबाबतचा मुद्दा उपस्थित केला गेला.

त्याबाबत सचिव यांनी असे प्रतिपादन केले की, मागील बैठकीत ठरल्यानुसार पिंपळेशवर कृपा इमारतीच्या गाळेवाटपाच्या सोडतीबाबत चौकशी करण्यात आली असून त्याबाबतचा अहवाल सादर करण्यात आला आहे.

हयाबाबत मा. सदस्य श्री बाप्पा सावंत यांनी असे प्रतिपादन केले की, मागे आपण असे ठरविले होते की, पुनर्रचित इमारतीतील गाळे वाटपाची सोडत काढताना मंडळाच्या ३-४ सदस्यांना सोडतीवेळी निमंत्रित करावयाचे आहे. परंतु अद्याप सोडतीवेळी सदस्यांना निमंत्रित केले जात नाही.

याबाबत सहमुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, प्रस्तावात सादर केल्यानुसार पिंपळेशवर कृपा हया पुनर्रचित इमारतीतील गाळेवाटपाची सोडत जी दि. ८.११.२००१ रोजी काढली होती ती रद्द करुन, नव्याने प्रचलित कार्यपध्दतीनुसार सोडत काढावी असा प्रस्ताव आहे. मा. सभापती यांनी विचारल्यानुसार सहमुख्य अधिकारी यांनी पुढे असेही प्रतिपादन केले की, ही सोडत पुन्हा नव्याने काढल्यास जर कोणी त्यास न्यायालयातून स्थगिती मिळविण्याचा प्रयत्न केल्यास आपण न्यायालयास असे सांगू शकतो की, पूर्वीची सोडत ही योग्य कार्यपध्दतीचा अवलंब न करता काढली असल्याने ती रद्द करुन पुन्हा नव्याने सोडत काढली जाणार आहे.त्यामुळे त्यास न्यायालयाची स्थगिती मिळण्याची शक्यता कमी वाटते. तसेच हयाबाबत विधी सल्लागार/प्राधिकरण यांचेही अभिप्राय घेऊन पुढील कार्यवाही करता येईल.

याबाबत मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की,नव्याने सोडत काढण्यास हरकत नाही. सोडत काढतेवेळी, संबंधित विभागातील मंडळाच्या सदस्यांना निमंत्रित करावे.

तदनंतर मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, रहिवाशांना मंडळाची कार्यप्रणाली, मंडळाचे संबंधित विभाग, अधिकारी यांची माहिती नसल्याने त्यांना त्यांच्या तक्रारींबाबत वेळच्यावेळी उत्तरे दिली जात नाहीत. हे सर्व रहिवाश्यांना घरबसल्या प्राप्त करुन देण्याच्या दृष्टीने व मंडळाच्या कार्यप्रणालीत पारदर्शकता आणण्याच्या दृष्टीने आपण मागील वर्षभर त्यावर अभ्यास करीत होतो. त्यानुसार आपण दुरुस्ती मंडळाची एक वेबसाईट तयार केलेली आहे. ती आता सर्वांना थोडक्यात माहितीसाठी व मंजूरीसाठी दाखविली जाणार आहे.आपणा सर्वांच्या मंजूरीनंतर त्याबाबत पुढील कार्यवाही केली जाईल.

तदनंतर ही वेबसाईट तयार करणा-या मे. डीजीनल टेक्नॉलॉजी प्रा.लि. हया कंपनीच्या प्रतिनिधींनी दुरुस्ती मंडळाची वेबसाईट सभागृहास दाखवून त्याबाबत थोडक्यात माहिती दिली. का.अ./सहकारी संस्था यानीही हया वेबसाईटविषयी थोडक्यात माहिती दिली. त्यानुसार हया वेबसाईटमुळे रहिवाशांना त्यांच्या तक्रारीचे निवारण घरबसल्या होणार असून ही वेबसाईट चालू ठेवण्याच्या दृष्टीने मंडळातील ठेकेदारांच्या जाहीरातीही या वेबसाईटवर प्रकाशित करण्याचा प्रस्ताव आहे जेणेकरुन जाहीरातीतून मंडळास आर्थिक उत्पन्न प्राप्त होऊन वेबसाईट चालविण्याचा खर्च मंडळ भागवू शकेल.

याबाबत मा. सभापती यांनी असे प्रतिपादन केले की, हयासाठी आपण एक समिती स्थापन करु या. ज्यांना वेबसाईटबद्दल माहिती आहे त्यांना हया समितीमध्ये नेमून चर्चा करु या. मा. सदस्य श्री सचिन सावंत, श्री आर.मोहन, का.अ./स.सं.कक्ष हयांच्यासारख्या २-३ जाणकार व्यक्तींनी याबाबत अभ्यास करुन त्यांची त्याबाबतची मते विचारात घेऊ या.

मा. सदस्य श्री गजेंद्र लष्करी हयांनी याबाबत अशी सूचना केली की, हया समितीमध्ये काही जाणकार वास्तुशास्त्रज्ञ व सेवानिवृत्त अधिका-यांचा समावेश करुन त्यांचीही मते घ्यावीत.

याबाबत मुख्य अधिकारी यांनी असे प्रतिपादन केले की, हया वेबसाईट विषयीची थोडक्यात कल्पना मा. सभापती महोदयांनी सांगितली आहे. आपण यासाठी एक छोटी समिती गठित करु या.

तद्नंतर मा. सदस्य श्री सचिन सावंत यांनी हया वेबसाईट विषयी त्यांची मते प्रदर्शित केली तदनंतर हया वेबसाईट विषयी मा. सदस्य श्री सचिन सावंत व इतर जाणकार अधिकारी व सदस्य यांनी एकत्र चर्चा करुन त्याबाबतचा निर्णय घेण्याचे सर्वानुमते ठरले.

बैठकीच्या अखेरीस, मा. सभापती यांनी उपस्थित सर्व सन्मा. सदस्य तसेच मंडळाच्या अधिकारी/कर्मचारी वर्गाचे मन:पूर्वक आभार मानून आजची बैठक संपल्याचे जाहीर केले व पुढील बैठक शनिवार, दिनांक २.२.२००२ रोजी दुपारी ३.०० वाजता घेण्याचे जाहीर केले.

सचिव/मुंइदुवपुमंडळ

मुख्य अधिकारी/मुंइदुवपुमंडळ

मा. सभापती/मुंइदुवपुमंडळ

परिशिष्ट - अ

मंडळाच्या दिनांक ५/०१/२००२ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यात आलेल्या दक्षिण परिमंडळातील अंदाजपत्रकांची यादी.

अ विभाग

अ.क्र	इमारतीचा तपशिल	दुरुस्तीचा टप्पा / मंडळ/नाहप्र	मजल्यांची संख्या / भाडेकरुंची संख्या	इमारतीचे बांधकाम क्षेत्रफळ / दुरुस्तीचा दर	अंदाजपत्रकाची एकूण रक्कम	निव्वळ टप्प्याची रक्कम	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेतील	रू.१०००/- प्रती चौ.मी. मर्यादेपेक्षा अधिक असलेली रक्कम	शेरा
१	२	३	४	५	६	७	८	९	१०
१.	२५ कारवा स्ट्रीट (मोघळ चाळ)	पांचवा / मंडळ	तळ + ४ / १२+ ४१ = ५३	९८४.९२ / ९९१.५९	९७६६३९.००	२३७७७९.००	२३७७७९.००	--	मंजूर
२.	७ अ, किंत्रीज रोड	दुसरा / मंडळ	तळ + १ / २+ ३ = ५	२१६.०२ / ८७४.८२	१८८९७८.००	१६७९७८.००	१६७९७८.००	--	मंजूर
३.	५२-६० सिताराम बिल्डींग, एस ब्लॉक, फलटन रोड	तिसरा / मंडळ	तळ + ४ / ८+ ५ = १३	८४४.०० / ९८०.९०	८२७९३७.००	५७४७३७.००	५७४७३७.००	--	मंजूर
४.	१२-१२-ए, १२-बी, नादिरशहा सुखीया स्ट्रीट, आब्बास इमारत	दुसरा / मंडळ	तळ + ४ / ३+ ९ = १२	४०५७.६० / २९३.०४	४७१५५९.००	४२७५५९.००	४२७५५९.००	--	मंजूर
५.	६ कॉव्हेंट स्ट्रीट	पहिला / मंडळ	तळ + १ / ५+ ३ = ८	४७०.५२ / १००२.२०	२०७८४१२.००	२०७८४२.००	२०७८४२.००	--	मंजूर
६.	१३६ महर्षी कर्वे मार्ग, क्वीन्स कोर्ट	पहिला(सु.) / मंडळ	तळ + ६ / १४+ ० = १४	३४७१.३० / ७११.३९	२४६९४५८.००	२४६९४५८.००	२४६९४५८.००	--	मंजूर
७.	२६५-२६७ डॉ. डी. एन रोड	तिसरा / मंडळ	तळ + ५ / २+ ५ = ७	६३६.९० / ९९३.६५	६२६४८९.००	३६५४८९.००	३६५४८९.००	--	मंजूर

HH 50 EHr

ब विभाग

८.	१२५ झकेरीया मस्जिद स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ३ / १२+ ४ = १६	७३५.३१ / ९८८.९५	७२७१८६.००	४९१६८६.००	४९१६८६.००	०	मंजूर
९.	९ पहिली फ्लॅक रोड	दुसरा(सु.) / मंडळ	तळ + ४ / ३८+ ५ = ४३	१५५१.८२ / १००३.०३	१५५६५२८.००	१३८२०८९.००	१३७७३७७.००	४७०२.००	मंजूर
१०.	४ नवरोजी हिल रोड	पहिला(सु.) / मंडळ	तळ + ५ / १७+ ३ = २०	१६३४.९७ / ९६९.२४	१५८४७००.००	१५८४७००.००	१५८४७००.००	०	मंजूर
११.	२८ सॅन्डाहास रोड, एस. व्ही. पी. रोड	दुसरा / मंडळ	तळ + ५ / १७+ १२ = २९	२८५०.०० / ७२४.९०	२०६५९७०.००	६६८०४२.००	६६८०४२.००	०	मंजूर
१२.	३४-३६ व्ही. व्ही. चंदन स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ४ / ३+ ९ = १२	५८१.३३ / ९१५.६९	५३२३२०.००	३००४५३.००	३००४५३.००	०	मंजूर
१३.	२२६-२२८ सॅम्युअल स्ट्रीट	पहिला(सु.) / मंडळ	तळ + ३ / ७+ १२ = १९	७७७.५९ / १०८१.२२	८४०७५२.००	८४०७५२.००	७७७५९७.००	६३१५५.००	मंजूर
१४.	११५-१२१ शायदा मार्ग	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ४ + २ = ६	१२९७.८० / ५४६.७०	७०९५२०.००	७०९५२०.००	७०९५२०.००	०	मंजूर
१५.	१४-१६-१९ काझी स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ५ + ३० = ३५	११८७.२८ / ६०६.९६	९५८०९५.००	७६३०९५.००	७६३०९५.००	०	मंजूर
१६.	१६४-१६६ कांबेकर स्ट्रीट	पहिला(सु.) / मंडळ	तळ + ३ / १४ + १० = २४	८२९.४२ / १११३.८०	९२३१५१.००	९२३१५१.००	८२९४३६.००	९३७२४.००	मंजूर
१७.	७५-सी, ७७-अ, बाबुला टॅंक रोड	पहिला / मंडळ	तळ + ४ / ३० + १५ = ४५	२७३८.६० / ६०४.१२	१६५४४६२.००	१६५४४६२.००	१६५४४६२.००	०	मंजूर
१८.	९९-अे-९९ ई, मोहम्मद अली रोड (१२३-१३३ शरिफ देवजी स्ट्रीट)	दुसरा(सु.) / मंडळ	तळ + ४ / ५ + ४ = ९	९३८.४७ / ९९७.९१	९९६३८८.००	६९६८४७.००	६९६८४७.००	०	मंजूर
१९.	७५-सी, बाबुला टॅंक रोड	पहिला(सु.) / मंडळ	तळ + ५ / ४७+ १९ = ६६	४१४६.१२ / ९९२.५७	४११५३३८.००	३७०७०८२.००	३७०७०८२.००	०	मंजूर
२०.	११३-११३ ए, कांबेकर स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ३ / १४+ २ = १६	९२४.६४ / ८४२.४८	६९४७४६.००	३२३६५८.००	३२३६५८.००	०	मंजूर

18496379

२१.	३-५-७ रघुनाथ महाराज मार्ग	दुसरा(सु) मंडळ	तळ + ४ / २६+ ८ = ३४	१५०३.३५ / ८३०.२३	१२४८१३२.००	८७६५६७.००	८७६५६७.००	०	मंजूर
२२.	२९-३१ खडक स्ट्रीट	चौथा मंडळ	तळ + ५ / ५१+ ९ = ६०	२१९१.०६ / ९५५.९९	२०९४६४९.००	४५१३५४.००	४५१३५४.००	०	मंजूर
	सी-१/२ विभाग								
२३.	१५४-१६६ बी, पांजरापोळ, ४८-५२ दुसरी पांजरापोळ लेन	दुसरा मंडळ	तळ + ३+४ भाग / ८०+ २५ = १०२	३१८८.२४ / ५८४.१६	१८६९४४१.००	११३३७४०.००	११३३७४०.००	०	मंजूर
२४.	११४-११८ इरास्कीन रोड	दुसरा मंडळ	तळ + ३ / २८+ ११ = ३९	६९९.५१ / ९८३.४३	६८७९२०.००	४३९२२०.००	४३९२२०.००	०	मंजूर
२५.	४३-४५ डॉ. माहितुरा मार्ग	चौथा मंडळ	तळ + २+ॲटीक / १८+ ४ = २२	६४५.५० / ९५१.९७	६१४४९७.००	१८२२६३.००	१८२२६३.००	०	मंजूर
२६.	१३४-१३६ अब्दुल रहेमान स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ३+४ भाग / ११+ २ = १३	५७८.४५ / ११५५.११	६४५०३३.००	४४९८६६.००	३८३२८०.००	६६५८५.००	मंजूर
२७.	१७ पहिली कारपेंटर स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ३+ ४ भाग / १६+ २ = १८	६६९.५५ / ९८५.४०	६५९७७३.००	५२५८६३.००	५२५८६३.००	०	मंजूर
२८.	७८ सैफी ज्युबली स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ + ५ / १०+ १ = ११	३२६.१० / ९६०.७७	३१३३०८.००	३१३३०८.००	३१३३०८.००	०	मंजूर
२९.	९२-९४ घोगारी मोहल्ला	तिसरा मंडळ	तळ + ३ / १६+ १ = १७	६१९.५५ / ९५०.२२	५८८७१०.००	५३४००४.००	५३४००४.००	०	मंजूर
३०.	१-१५ बारा इमाम रोड	तिसरा मंडळ	तळ + २ / ५०+ १६ = ६६	२१२७.५३ / ९२७.२९	२१२१७५७.००	५१०४५३.००	५१०४५३.००	०	मंजूर
३१.	८९ सैफी जुबली स्ट्रीट	पहिला मंडळ	तळ + ४ / ९+ १ = १०	२९४.०३ / १७६८.६७	५२००४३.००	५२००४३.००	२९४०३०.००	२२६०१३.००	मंजूर
३२.	११६ अली उमर स्ट्रीट	दुसरा मंडळ	तळ+४ / ५+ १ = ६	२९९.६६ / १०२०.१२	३०५६८८.००	२७१४२८.००	२६५४००.००	६०२८.००	मंजूर

२८०

२४७०४४८८

६३

३३.	१९-२१-२३ मटन स्ट्रीट	तिसरा / मंडळ	तळ + ४ / १३ + २ = १५	५९९.०० / ९८३.१३	५८८८९६.००	२९८१४६.००	२९८१४६.००	०	मंजूर
३४.	११६-१२६ किका स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ४ / ११६ + ३० = १४६	५३९६.०० / ५०१.९४	२७०८९१८.००	१३१२९१८.००	१३१२९१८.००	०	मंजूर
३५.	१३१-१३३शेख मेमन स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ५ / ४ + ४ = ८	८२३.७१ / ९७१.३७	८००१०९.००	६४२७४५.००	६४२७४५.००	०	मंजूर
३६.	२५८-२६२ (ब्लॉक नं.३) जंजीकर स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + २ / ४ + ७२ = ७६	१३००.७२ / ५०७.५५	६५९६५५.००	२६९४३९.००	२६९४३९.००	०	मंजूर
३७.	१८०-१८६ इब्राहिम रहिमतुल्ला रोड	तिसरा / मंडळ	तळ + ३ / १६ + ८ = २४	७७८.०० / ९८५.६७	७६६८५३.००	५२९८५२.००	५२९८५२.००	०	मंजूर
३८.	५८ ढब्बु स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ४ / २२ + ४ = २६	६८५.७७ / ६२७.११	४३००५६.००	३५०८४६.००	३५०८४६.००	०	मंजूर
३९.	८०-८२ ढब्बु स्ट्रीट	तिसरा / मंडळ	तळ + ४+ ५ भाग / १४ + ५ = १९	५५१.८० / ९८०.४०	५४०९८६.००	३२०५७८.००	३२०५७८.००	०	मंजूर
४०.	३०-३२ दुसरी कार्पेटर स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ६ + ३ = ९	३३६.७२ / ८७३.७५	२९४२०८.००	२४३२६७.००	२४३२६७.००	०	मंजूर
४१.	८ अली उमर स्ट्रीट	तिसरा / ना.ह.प्र	तळ + २+ ३ भाग / ५ + ३ = ८	३५२.०० / १०५७.३९	३७२२०१.००	२२१८०२.००	२२१८०२.००	२९६४.००	मंजूर
४२.	८० अली उमर स्ट्रीट	तिसरा / ना.ह.प्र	तळ + ५ / ५ + २ = ७	२७९.८४ / १४७१.७३	४११८५०.००	२२३७२९.००	९१७१९.००	१३२०१०.००	मंजूर
४३.	१०१ भंडारी स्ट्रीट	दुसरा / मंडळ	तळ + ३ / १४ + १ = १५	२६०.२० / १०६१.३२	२७६१५५.००	१८६००६.००	१७००५२.००	१५९५५.००	मंजूर

सी-३/४ विभाग

४४.	९५-डी, आत्माराम मर्चंट रोड (८९-९१-९३ व १०० असेंबली लेन	तिसरा / मंडळ	तळ + ३ / २७+ ८ = ३५	१२१४.८० / ९२७.७८	११२७८६९.००	२०९८१९.००	२०९८१९.००	०	मंजूर

1239

2,95,13,635.

४५.	२० अनंतवाडी, सिताराम पोद्दार मार्ग	तिसरा मंडळ	तळ ± ३ / ५+ ३ = ८	५१७.१६ / ९२५.००	४७८३७३.००	२९४६४३.००	२९४६४३.००	०	मंजूर
४६.	१७-१९ जांभुळवाडी	पांचवा मंडळ	तळ ± ३ / २६+ १६ = ४२	१५६२.८२ / ९९२.८१	१५५१५८५.००	३७९४७०.००	३७९४७०.००	०	मंजूर
४७.	११ नवीवाडी	दूसरा मंडळ	तळ ± २ / ५+ १ = ६	३७९.६५ / ९९४.७७	३७७६६६.००	१९९२१०.००	१९९२१०.००	०	मंजूर
४८.	१७, दुसरी मरीन स्ट्रीट, धोबी तलाव	पांचवा मंडळ	तळ ± ५ / १०+ ५ = १५	५४३.७७ / १३३६.१०	७२६५३३.००	१४८७०६.००	१४८७०६.००	०	मंजूर
४९.	१९१ एच कॅव्हल क्रॉसलेन नं. ९	दुसरा मंडळ	तळ ± २ / ३ + ० = ३	२८३.७५ / ९९८.६५	२८३३६८.००	१९८२४३.००	१९८२४३.००	०	मंजूर
५०.	९९-१०३ कांतीलाल शर्मा मार्ग, गोविंदा निवास	पांचवा मंडळ	तळ ± ५ / ७ + २५ = ३२	१०८०.०० / ९१५.४७	९८८७१२.००	५७३२१२.००	५७३२१२.००	०	मंजूर
५१.	९ करेलवाडी	दुसरा मंडळ	तळ ± ४ / ४ + १ = ५	२३०.०० / ९५९.६२	२२०७१३.००	१९१२१८.००	१९१२१८.००	०	मंजूर
५२.	५ करेलवाडी	तिसरा मंडळ	तळ ± ३ / ५ + ० = ५	१९०.०० / ८९९.२३	१७०८५५.००	१०९९२३.००	१०९९२३.००	०	मंजूर
५३.	४१३ एफ काळबादेवी रोड	दुसरा मंडळ	तळ ± ४ / ६ + ३७ = ४३	१३५२.३० / ६९३.०३	९३७१९२.००	६८७०८१.००	६८७०८१.००	०	मंजूर
५४.	११ ताकवाडी	दुसरा मंडळ	तळ ± १ / १ + १० = ११	२८९.२८ / ९९५.९७	२८८११६.००	१५२६६१.००	१५२६६१.००	०	मंजूर
५५.	१३१ के. एम. शर्मा मार्ग	पांचवा मंडळ	तळ ± ४ / १०२ + ८५ = १८७	३८१९.०० / ९९६.८९	३८०७१३६.००	९४२८८६.००	९४२८८६.००	०	मंजूर
५६.	२७-२९ पिकेट क्रॉस लेन (२३-३१ पिकेट क्रॉस लेन)	चौथा मंडळ	तळ ± ३ / ० + ५१ = ५१	१४३४.०० / ९८८.०२	१४१७३१७.००	७०००६७.००	७०००६७.००	०	मंजूर

१६८६ गा.

३३५६०९५५

९६

५७.	१७५ ठाकूरद्वार रोड	तिसरा मंडळ	तळ ± ३ / १८ + ७ = २५	५६४.७४ / ९३७.५०	५२९४४८.००	२४९५३६.००	२४९५३६.००	०	मंजूर
५८.	४८ विजयवाडी	दुसरा मंडळ	तळ ± ४ / ९ + ० = ९	५६७.७३ / ८७७.८५	४९६६३१.००	३२६९१२.००	३२६९१२.००	०	मंजूर
५९.	११४ जी, सिताराम पोद्दार मार्ग	तिसरा मंडळ	तळ ± ३ / २१ + १ = २२	७२९.४७ / ७२४.३५	५२८३८९.००	१७२३८९.००	१७२३८९.००	०	मंजूर
६०.	११७-११७बी, दादीशेठ अग्यारी लेन	तिसरा मंडळ	तळ ± ३ / ८ + ११ = १९	६३२.०० / ९९१.२९	६२६५००.००	४३८३०६.००	४३८३०६.००	०	मंजूर
६१.	७६-७८ तेल गल्ली	पहिला ना. ह. प्र.	तळ ± ४ / १९ + १७ = ३६	५६२.७० / १३२५.९९	७४६१३९.००	७४६१३९.००	५६२७००.००	१८३४३९.००	मंजूर
६२.	१७६ डॉ. व्हीगास स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ +१ +पोटमाळा / २ + २ = ४	४९३.५० / ९७१.१०	४७९२४०.००	३००७३८.००	३००७३८.००	०	मंजूर
६३.	१७ पंचायत वाडी (१५-२५ पंचायत वाडी), नखवा चाळ	दुसरा मंडळ	तळ ± ४ / १९ + ४१ = ६०	१३५२.६० / ९८३.१५	१३२९८१४.००	६५३५१४.००	६५३५१४.००	०	मंजूर
६४.	३५-३५ अ, कॅव्हल क्रॉस लेन क्र.१	दुसरा मंडळ	तळ ±३ व ४ अंशत: / २८ + १७ = ४५	१२८१.३१ / ८०१.९३	१०२७५२१.००	३८६८६६.००	३८६८६६.००	०	मंजूर
६५.	१९१ एस आर टी कॅव्हल क्रॉस लेन	तिसरा मंडळ	तळ ± ४ / ३१ + २१ = ५२	१६१४.९३ / ७८१.७०	१२६२३९९.००	१८७३९९.००	१८७३९९.००	०	मंजूर
६६.	२१-२३ विजय वाडी	दुसरा मंडळ	तळ ± ३ / १० + ५ = १५	९९७.०० / ६४२.०९	६४०१६६.००	३४१०६६.००	३४१०६६.००	०	मंजूर

डी-१ विभाग

६७.	५३-५५ मुगभाट क्रॉस लेन	तिसरा मंडळ	तळ ± १ / ५१+ ९ = ६०	१४८१.४० / ९८२.११	१४५६१७५.००	४०६१७५.००	४०६१७५.००	०	मंजूर
६८.	१७-१९, बानगंगा मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± २ / ५+ ० = ५	५५४.४३ / ९३७.३३	५१९६८७.००	२४२६८७.००	२४२६८७.००	०	मंजूर

६९.	१३४-१३८ ऑगस्ट क्रॉती मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± ५ ६ + १२ = १८	२२३४.०० ७९४.९६	१७७६७४६.००	१३५१७४६.००	१३५१७४६.००	०	मंजूर
७०.	७-७-अे, ७ एफ, गांमदेवी मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± ५ ४३ + ९ = ५२	१७४९.६५ ६८१.११	११९१७१९.००	७९१३१९.००	७९१३१९.००	०	मंजूर
७१.	१२३-१३१ जे एस एस मार्ग	तिसरा/सु. मंडळ	तळ ± ४ १६+ ४ = २०	१३०८.२७ ९३१.५९	१२१८७७३.००	८२०७७३.००	८२०७७३.००	०	मंजूर
७२.	२४२ वाळकेश्वर मार्ग	चौथा मंडळ	तळ ± २ ८ + ७ = १५	७७०.४८ १३७१.८१	१०५६९४७.००	४८३०४७.००	१९६५७५.००	२८६४७२.००	मंजूर
७३.	२१ ए, तेजपाल मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± ३ २५ + ७ = ३२	८४१.८६ ८५९.०८	७२३२२९.००	४७०६७१.००	४७०६७१.००	०	मंजूर
७४.	१९-१९-ए, १९-जी, २१-२१-ए, जे. एस.एस. मार्ग	पहिला ना. ह. प्र	तळ ± ४ २१ + ८१ = १०२	४८३४.९१ २५८.४८	१३४९७६५.००	१२४९७६५.००	१२४९७६५.००	०	मंजूर
७५.	३०२ डी, ई व्ही. पी. मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± ३ १० + २ = १२	८३५.०० ८०३.६६	६७१०५७.००	४७००५७.००	४७००५७.००	०	मंजूर
७६.	५ नवलकर लेन	तिसरा मंडळ	तळ ± २ १ + २ = ३	३३५.७१ ८१४.५६	२७३४५६.००	१३२४५६.००	१३२४५६.००	०	मंजूर
७७.	३-५-७, पंडीता रमाबाई मार्ग	दुसरा/सु. मंडळ	तळ ± २ १३ + १२ = २५	२१६५.१७ १००७.२७	२१८२९३१.००,	१८३२९३१.००	१८१७१७०.००	१५७६१.००	मंजूर
७८.	२२-२४ -२२-सी, नेपीयन सी रोड	तिसरा मंडळ	तळ ± १ २ + ४ = ६	९८१.६८ ८७०.६५	८५४७०४.००	५७८८०४.००	५७८८०४.००	०	मंजूर
७९.	१३७-१३९-१३९-ए, जे. एस.एस. रोड	पहिला मंडळ	तळ ± ४ ७ + ३ = १०	५५९.३३ ९९०.३२	५५३९२०.००	५५३९२०.००	५५३९२०.००	०	मंजूर
८०.	२६५-२६५-ए बी, जे. एस. एस. मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± ५ १० + १ = ११	१२३७.७५ ८९८.१३	१०१२६४८.००	८७४९४८.००	८७४९४८.००	०	मंजूर
८१.	२४८-२४८ ए बी, वाळकेश्वर मार्ग	दुसरा मंडळ	तळ ± ३ ४ + १ = ५	५६५.३२ ९९५.२७	५६२६४८.००	३२२६४८.००	३२२६४८.००	०	मंजूर

4,75,59,767

८२.	६८-७० ऑगस्ट क्रॉती मार्ग	चौथा / मंडळ	तळ + ५ / १५ + ७ = २२	३६२३.१० / ८८६.५१	३२११९४३.००	७२३५४३.००	७२३५४३.००	०	मंजूर
८३.	२९-ई, खोताची वाडी	पहिला / मंडळ	तळ + ॲटीक / ३ + ० = ३	१८१.५१ / १०१०.६२	१८३४३९.००	१८३४३९.००	१८१५१०.००	१९२९.००	मंजूर

डी-२ विभाग

८४.	१५८-१८० खेतवाडी बॅक रोड, तुळसी बिल्डींग	तिसरा/सु. / मंडळ	तळ + ३+ ४ भाग / १२+ ४० = १७६	६१०७.०५ / ९९८.९६	६१००७३५.००	२९१६७९८.००	२९१६७९८.००	०	मंजूर
८५.	३१४-३२८ फॉकलंड रोड, तबेला बिल्डींग,	तिसरा / मंडळ	तळ + २ / ११ + ६ = १७	६९७.१४ / १२६८.४८	८८४३३१.००	५७७५०३.००	३९०३३२.००	१८७१७१.००	मंजूर
८६.	२५ महिला पटेल अग्यारी लेन	तिसरा / मंडळ	तळ + १ / ८+ ६ = १४	१०३२.०७ / ९९७.२२	१०२९२००.००	७८९८२३.००	७८९८२३.००	०	मंजूर
८७.	६३ प्रॉक्टर रोड, सुंदर सदन	पहिला/सु. / मंडळ	तळ + ५ / १८+ ११ = २९	१७७०.१५ / ९५७.३२	१६९४६०४.००	१६९४६०४.००	१६९४६०४.००	०	मंजूर
८८.	२७५ ई, जावजी दादाजी मार्ग,(जुनी चन्नई बिल्डींग)	दुसरा / मंडळ	तळ + ३ / ७+ १ = ८	७१७.१२ / ६७४.५२	४८३७२५.००	३३७३०९.००	३३७३०९.००	०	मंजूर
८९.	२७५ एन न्यु खान बिल्डींग, चिखलवाडी	दुसरा / ना.ह.प्र	तळ + ३ / १३ + ० = १३	७३९.६४ / ९९८.८३	७३८७८०.००	४५७८०३.००	४५७८०३.००	०	मंजूर
९०.	९ उरणवाला स्ट्रीट, पुष्पा निवास	दुसरा / मंडळ	तळ + ४ / १० + १ = ११	११०१.७७ / ९९४.८५	१०९५४०६.००	७०८४०६.००	७०८४०६.००	०	मंजूर
९१.	२८-३० विल्सन स्ट्रिट	तिसरा / मंडळ	तळ + २ / ८ + ३ = ११	५३१.७० / १३२४.११	७०४०३१.००	४७९४२५.००	३०७०९६.००	१७२३२९.००	मंजूर
९२.	३९४ ई डॉ. डी. बी. मार्ग, लॅमीन्टन टॅरेस	पहिला/सु. / मंडळ	तळ + ४ / ११ + १२ = २३	१७००.२४ / ९९४.२४	१६९०४५८.००	१६९०४५८.००	१६९०४५८.००	०	मंजूर
९३.	३९४-ए, ३९४ डी, डॉ. डी. बी. मार्ग	पहिला/सु. / मंडळ	तळ + ५ / ४ + १८ = २२	१५९३.९३ / ९९७.०५	१५८९१४२.००	१५८९१४२.००	१५८९१४२.००	०	मंजूर

2658 5,97,08,020

69

९४.	४ फॉकलंड रोड, १ली क्रॉस लेन, रुक्मीनी निवास	चौथा मंडळ	तळ + २ २४ + ० = २४	२६८.०० / १४७७.४१	३९५९४७.००	२६९३३०.००	१४१३८३.००	१२७९४७.००	मंजूर
९५.	१६२ ए, ताडदेव रोड	दुसरा मंडळ	तळ + १ ९ + ४ = १३	३११.१७ / ९६७.०५	३००९१८.००	२६०९१८.००	२६०९१८.००	०	मंजूर
९६.	२६६-२६६-ए, जावजी दादाजी मार्ग (हरमोशद मेन्शन)	तिसरा/सु. मंडळ	तळ + ४ ८ + ८ = १६	२०१३.८५ / ९९५.७३	२०५२५२.००	१६०००२६.००	१६०००२६.००	०	मंजूर
९७.	१० फॉकलंड रोड, ५ वी क्रॉस लेन,	तिसरा मंडळ	तळ + २ १४ + ० = १४	८०३.२४ / ९८५.०२	७९१२११.००	५३४३२३.००	५३४३२३.००	०	मंजूर
९८.	४८-५० स्लेटर रोड,	सहावा मंडळ	तळ + ४ ३१ + १४ = ४५	२९३८.२० / १२३८.९४	३६३९९५२.००	१०१७९७२.००	३१४२००.००	७०१७७२.००	मंजूर
९९.	३७३-३७९ फॉकलंड रोड, कपुर बिल्डींग	तिसरा मंडळ	तळ + २ २२ + ४ = २६	६२५.०० / १०१६.६३	६३५३९६.००	५१७१४६.००	५०६७५०.००	१०३९६.००	मंजूर
१००.	२९ विल्सन स्ट्रीट	तिसरा मंडळ	तळ + ४ २८ + २ = ३०	९८८.०३ / ९६३.०७	९५१५४६.००	४८६९५७.००	४८६९५७.००	०	मंजूर

2826

6,43,94,692

63

परिशिष्ट 'ब'

मंडळाच्या दिनांक ७/१२/२००१ रोजी झालेल्या बैठकीत प्रशासकिय मंजूरी देण्यांत आलेल्या उत्तर परिमंडळातील अंदाजपत्रकाची यादी.

ई विभाग

१.	ई	अ	२-के, खंबाटा लेन,माझगांव,मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ १३ + १= १४	१३८५.७९ ६१४.००	८५०७०५/- ५५५४६५/-	५५५४६५/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	११२-अे, पटेल मेन्शन, डिमटिमकर रोड,	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ३३ + १ = ३४	७९६.४४ ९४८.१५	७५५१४४/- ४३९५१४/-	४३९५१४/-	--	-"-
३.	-"-	-"-	१०२-११२,पटेल मेन्शन,डिमटिमकर रोड, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ११ + ४ = १५	८६६.२० ९४६.२३	८१९६२९/- ५३५९५४/-	५३५९५४/-	--	-"-
४.	-"-	-"-	८६-डी, डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोड, माझगांव,मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ १४ + २ = १६	१८००.६० ९४७.३७	१७०५८३६/- ७०९४०५/-	७०९४०५/-	--	-"-
५.	-"-	-"-	७०-७२, टेमकर स्ट्रीट, नागपाडा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ +२+३ अंशतः ४ + ० = ४	४०१.६१ ८७५.४०	३५१५५३/- ३०५५५७/-	३०५५५७/-	--	-"-
६.	-"-	-"-	१९, अल्स्टर रोड, भायखळा (पुर्व),मुंबई	चौथा टप्पा मंडळ	तळ + २ ४१ +१० = ५१	१०५५.०० ९६४.००	१०१७०८५/- ५०९८७१/-	५०९८७१/-	--	-"-
७.	-"-	-"-	३३-४१, कपाडिया बिल्डींग, सेठ मोतिशा लेन, भायखळा,मुंबई	पाचवा टप्पा मंडळ	तळ + २ ३९ + ५ = ४४	१२६६.०७ ८९१.१२	११२८२३२/- ६६४०२१/-	६६४०२१/-	--	-"-
८.	-"-	-"-	७३, डिमटिमकर रोड, नागपाडा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ २१ + ८ = २९	९००.०० १०६७.००	९६०२८८/- ६६१५५०/-	६०१२६२/-	६०२८८/-	-"-
९.	-"-	-"-	५, खटाव मिल चाळ, टँक पाखाडी रोड, भायखळा (प),मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३+४ ८१ +० =८१	२९८०.०० ४६६.९५	१३९११६३/- १३९११६३/-	१३९११६३/-	--	-"-
१०.	ई	अ	१-एन, गनपावडर रोड, (पठाण चाळ),मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ १४ +२ = १६	७२२.०० ९०२.५०	६५१५६२/- ५७९९९२/-	५७९९९२/-	--	-"-

६३(अ)

१.	२.	३.	४.	[illegible]	६.	७.	८.	९.	--	११.
११.	-"-	क	५८, मोरलॅन्ड रोड, आग्रीपाडा,मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ३ १२ + ० = १२	१५८४.८१ ६७१.५०	१०६४२१३/- १०६४२१३/-	१०६४२१३/-		मंजूर
							१०६९५४१०/- ७४१६७०५/-	७३५६४१७/-	६०२८८/-	

फ.ग.(द) विभाग

१.	फ.ग/द	अ	५४-एफ, गवालिया चाळ, राजू बाबाजी चाळ क्र.५, शंकर नम पथ,मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ + ० ३० + ० = ३०	४४०.३९ ८३८.८४	३६९४२०/- ३६९४२०/-	३६९४२०/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	७२-बी, शेटये बिल्डींग, सयानी रोड, मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ३९+१२ = ५१	१३६५.२१ ९२३.१०	१२६०२३१/- २६९१२३/-	२६९१२३/-	--	-"-
३.	-"-	-"-	१५६-बी, एन.एम.जोशी मार्ग, लोअर परेल,मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ+ १ २२+० = २२	४१२.९४ ९९८.६८	४१२३९६/- ९६६२६/-	९६६२६/-	--	-"-
४.	-"-	ब	६४-एन, नारायण निवास, परेल व्हीलेज, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळमजला ८+ ० = ८	१९८.८८ १०१२.४७	२०१३६२/- २०१३६२/-	१९८८८०/-	२४८२/-	-"-
५.	-"-	अ	कोहिनूर मिल चाळ क्र.११, नायगांव क्रॉस रोड, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + २ ६ +० = ६	२०३.८० ९९३.७१	२०२५२०/- ११२८९६/-	११२८९६/-	--	-"-
६.	-"-	-"-	भिवंडीवाला बिल्डींग, डॉ.बी.ए.रोड, मुंबई	ति.टप्पा सुधा मंडळ	तळ + २ ६४ +१८ = ८२	२४१०.४१ ९७०.८४	२३४०१३१/- ११९७४१५/-	११९७४१५/-	--	-"-
७.	-"-	-"-	११२, मित्र भवन, आई माई मेरवानजी स्ट्रीट, मुंबई	ति.टप्पा सुधा मंडळ	तळ + ३ ३५ +१ = ३६	१३७७.७० ९९९.७४	१३७७३४५/- ७७९४४५/-	७७९४४५/-	--	-"-
							६१६३४०५/- ३०२६२८७/-	३०२३८०५/-	२४८२/-	

3377

फ.ग.(उ) विभाग

१.	फ.ग/उ	ब	१२, दाणा गल्ली, कापड बाजार, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ ९+ ० = ९	४२४.२३ ८८५.४०	३७५६१५/- ३७५६१५/-	३७५६१५/-	--	मंजूर
२.	-"-	-"-	५, दत्ता आश्रम, शिवाजी पार्क रोड क्र.४, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ २ २०+ - = २०	९६७.६६ ४७६.६६	४६१३९३/- ४६१३९३/-	४६१३९३/-	--	-"-
३.	-"-	अ	६४, समताझ बिल्डींग, वांझेवाडी, माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ २२ + ६ = २८	६७०.८१ ८५४.९०	५७३४७९/- ५७३४७९/-	५७३४७९/-	--	-"-
४.	-"-	-"-	१३, दत्त निवास, ॲश लेन, दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ४ + ० = ४	५५३.९५ ९८८.४६	५४७५६१/- ३२९२६६/-	३२९२६६/-	--	-"-
५.	-"-	अ व क	५२२-बी, कृष्णा निवास, आर.पी.भसानी मार्ग, माटुंगा, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ + ३ ६ + - = ६	७०४.२१ ९४१.४६	६६२९८८/- ४४६४२०/-	४४६४२०/-	--	-"-
६.	-"-	अ	२०३ अे-बी-सी, डर्बी मेन्शन, एल.जे.रोड, माहिम,मुंबई	तिसरा टप्पा मंडळ	तळ + ४ २४ + ३ = २७	११४६.३० ७४८.८७	८५८४४१/- २८५२९१/-	२८५२९१/-	--	-"-
७.	-"-	-"-	२४, चंद्रभागा भवन, डी.एल.वैदय मार्ग, दादर, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ २ ११ + - = ११	५०७.७० ७३०.११	३७०६७८/- ३७०६७८/-	३७०६७८/-	--	-"-
८.	-"-	-"-	माहिम मॅन्शन, अे ब्लॉक, एम.एम.सी.रोड,माहिम, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ५९ + ९ = ६८	१७०७.०७ ८०४.२५	१३७९२३/- ६२९६०३/-	६२९६०३/-	--	-"-
९.	-"-	अ	३६६-३६६अे, दादरकर बिल्डींग, एन.सी.केळकर मार्ग, दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ ६ + १ = ७	४८८.१५ ९९२.४७	४८४४७५/- ४४६४२०/-	४४६४२०/-	--	-"-
१०.	फ.ग/उ	अ	६५-ई, रंजारा भवन,एस.के.बोले रोड,दादर, मुंबई	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ २ ५ + ० = ५	२६७.८१ ९७८.९६	२६२१७६/- २३३५६५/-	२३३५६५/-	--	-"-

३५१२

६६

१.	२.	३.	४.	[illegible]	६.	७.	८.	९.	१०.	११.
११.	-"-	अ	४,दाते भुवन, अक्षीकर स्ट्रीट, मुंबइ	दुसरा टप्पा मंडळ	तळ+ ३ १४ +१८ = ३२	७७६.५६ ७४९.२७	५८१८५४/- ३७३९४१/-	३७३९४१/-	--	-"-
१२.	-"-	-"-	८१, ॲव्हेन्यु बिल्डींग, वीर सावरकर मार्ग, माहिम, मुंबई	पहिला टप्पा मंडळ	तळ+ ३ १४+ ५= १९	८०७.८० ६६३.७६	५३६१८६/- ५३६१८६/-	५३६१८६/-	--	मंजूर
१३.	-"-	-"-	दागिनावाला चाळ, अे ब्लॉक, एम.एम. छोटानी मार्ग, माहिम, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळमजला ९ + ० = ९	२९३.७३ ९९७.२८	२९२९३२/- २१११९८/-	२१११९८/-	--	-"-
१४.	-"-	-"-	२४८-बी, सुखमन मेन्शन, एल.जे.रोड, दादर, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ३ ५ + ३ = ८	४६३.२५ १००८.४१	४६७१४८/- ३७२१५८/-	३६८२६०/-	३८९८/-	मंजूर
१५.	-"-	-"-	प्लॅाट क्र.६०, मधुसुदन, रोड क्र.२५-सी, सायन (पश्चिम), मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ३ १२+ २ = १४	७६३.०७ ९९७.४८	७६११५४/- ६७४९१४/-	६७४९१४/-	--	-"-
१६.	-"-	क	४३०, मायकल भवन, एल.जे.रोड,माहिम, मुंबई	दु.टप्पा सुधा मंडळ	तळ+ ३ २०+ ९ = २९	१६५५.७० ९३७.०७	१५५१५१२/- १२५१११८/-	१२५१११८/-	--	-"-
							८७८७५९२ ६९४१५६२	६९३७६६४/-	३८९८/-	

3673

६९